रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १२१ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**नवी दिल्ली** : जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात जवान आणि दहशताद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. तर, एका अधिकाऱ्यासह सुरक्षा दलाचे पाच जवान जखमी झाले आहेत. जिल्ह्यातील देवसर भागातील आदिगाम गावात शनिवारी पहाटे सुरक्षा दलांनी घेराबंदी आणि शोधमोहीम सुरू केल्यानंतर चकमक सुरू झाली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक (वाहतूक) मुमताज अली चकमकीत किरकोळ जखमी झाले. या परिसरात अद्याप जवानांकडून शोधमोहीम सुरू आहे.


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २९ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹







### वेधक

## मुंबईवर दहशतवादी हल्ल्याचा धोका

**मुंबई** : भारताची आर्थिक राजधानी मुंबईमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे. गुप्तचर यंत्रणांनी सणासुदीच्या दिवसात दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवली आहे. या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर शहराच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. महत्त्वाची ठिकाणे, शासकीय कार्यालये, पर्यटनस्थळे अशा ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. या ठिकाणी कडक तपासणी करण्यात येत आहे. विमानतळ, रेल्वे स्टेशन, मॉल्स आणि सार्वजनिक ठिकाणांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. सुरक्षा रक्षकांनी या ठिकाणांवरील तपासणी सुरू केली आहे.

## '.. तर राज्याची तिजोरी खाली होईल'

**मुंबई** : लाडकी बहीण योजनेवरुन मनसे प्रमुख राज ठाकरेंनी सरकारवर निशाणा साधला आहे. ते सध्या विदर्भ दौऱ्यावर आहेत. लाडकी बहीण योजनेचा ऑक्टोबरचा हप्ता दिल्यानंतर जानेवारी महिन्यात पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे नसतील. सत्ताधाऱ्यांच्या स्वार्थासाठी योजना तयार केल्या जात असतील, तर त्याचा राज्यावर परिणाम होईल. राज्य खड्ड्यात घातलं जात असेल, तर हे चुकीचं आहे. महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणले पाहिजे, रोजगार दिला पाहिजे. समाजातील कोणताही घटक फुकट काही मागत नाही, अशी जोरदार टीका राज ठाकरेंनी सरकारवर केली.

### गुन्ह्यांबाबत वृत्तपत्रातून तीनदा जाहिरात द्या, आयोगाचे निर्देश

# राजकीय गुंडांची गोची

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आगामी विधानसभा निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या गुन्ह्यांबाबत वृत्तपत्रातून आणि वृत्तवाहिनीतून तीनदा जाहिरात द्यावी, असे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहे. आयोगाच्या या मास्टरस्ट्रोकमुळे इच्छुक उमेदवारांसह सर्वच राजकीय पक्षाची डोकेदुखी वाढली आहे. कारण, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी का दिली? याबाबत संबंधित राजकीय पक्षांना कारण द्यावे लागणार आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवाराशिवाय चांगले उमेदवार नव्हते का? याबाबतही स्पष्टीकरण द्यावे लागणार आहे. आयोगाच्या या निर्णयामुळे उमेदवारांसह राजकीय पक्षांची चांगलीच कोंडी झाली आहे.

पान २ वर

### नेत्यांची डोकेदुखी वाढली




### एटीएम व्हॅनवर निर्बंध, ॲम्ब्युलन्सवर नजर

महाराष्ट्राला सहा राज्यांच्या सीमा आहेत. या सीमांवर ३०० चेकपोस्ट तयार केले जातील. जेणेकरून अवैध रोख रक्कम, अंमली पदार्थ, दारू राज्यात आणण्यापूर्वी रोखली जाईल. तसेच रुग्णवाहिका आणि एटीएममध्ये रोख रोक्कम भरण्यासाठी जी कॅश व्हॅन वापरली जाते, त्यावरही नजर ठेवली जाईल. संध्याकाळी सहा ते दुसऱ्या दिवशी आठ वाजेपर्यंत या व्हॅन वापरल्या जाणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश कुमार यांनी दिले आहे. तसेच निवडणूक प्रचाराच्या काळात हेलिकॉप्टरचा वापर होतो. अशा वेळी हवाईमार्गे बेकायदेशीररित्या वस्तूंची वाहतूक होऊ नये म्हणून सर्व हेलिपॅड्सवर हेलिकॉप्टर्सची तपासणी केली जाईल, असेही राजीव कुमार म्हणाले.

### २८८ मतदारसंघ

एकूण मतदार ९.५९ कोटी

- पुरुष ४.९५, स्त्री ४.६४ कोटी महिला मतदारांमध्ये १०.७७ लाखांची वाढ
- तृतीयपंथीय ५९९७
- दिव्यांग ६.३२ लाख
- ८५ वर्षांवरील १२.४८ लाख
- नवमतदार १९.४८ लाख
- मतदान केंद्र १ लाख १८६
- शहर : ४२ हजार ५८५
- ग्रामीण : ५७ हजार ६०१

## सीतारामन यांच्यावर खंडणीचा आरोप

### गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

**।नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. बंगळुरूच्या विशेष न्यायालयाकडून अर्थमंत्र्यांविरुद्ध खंडणीच्या आरोपांखाली एफआयआर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. न्यायालयाने इलेक्टोरल बाँडद्वारे खंडणीच्या आरोपांसंदर्भात हा आदेश दिला आहे. हा आदेश ४२ व्या एसीएमएम कोर्टाने जारी केला आहे.



जनाधिकार संघर्ष संघटनेचे आदर्श अय्यर यांनी निर्मला सीतारामन आणि इतरांविरोधात वैयक्तिक तक्रार दाखल केली होती. पीसीआरमध्ये इलेक्टोरल बाँडद्वारे खंडणीचा आरोप करण्यात आला होता. यानंतर बंगळुरूमधील

पान २ वर






## सेफ्टी झोनचं संकट

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण येथील नौदलाच्या सेफ्टी झोनमध्ये ३५ वर्षांपूर्वी सोसायटींनी उभारलेल्या शेकडो धोकादायक इमारती व घरांना रिडेव्हलपमेंटसाठी विविध शासकीय विभागाकडून आवश्यक असलेल्या परवानग्या नाकारण्यात येत आहेत. यामुळे रिडेव्हलपमेंटसाठी आलेल्या इमारती, घरे पाडून त्याजागी नवीन इमारती उभारण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे अशा धोकादायक घरे व सोसायटींच्या इमारतीत राहणाऱ्या



- **५० हजार रहिवाशांवर बेघर होण्याचे संकट**
- **हजारो घरमालक, शेकडो संस्था हवालदिल**

५० हजार रहिवाशांवर लवकरच बेघर होण्याचे संकट पान २ वर

## महावितरणचे अधिकारी ठेकेदारांवर फिदा

**। पेण । प्रतिनिधी ।**

गेली आठ दिवस पेण शहरात विजेचा लपंडाव सुरु आहे. याला सर्वस्वी जबाबदार महावितरण कंपनीचे अधिकारी आहेत, असा आरोप पेणमधील नागरिक करीत आहेत. गेली आठ दिवस पेण शहरातील विजेच्या तारा बदलणे, पोल बदलणे हे काम सुरु आहे. खरं पाहता, या विजेच्या तारा तातडीने बदलणे काहीही गरज नसतानादेखील ठेकेदाराचे भले व्हावे म्हणून अधिकारी नागरिकांना वेठीस धरुन दिवसभरात चार ते पाच तास लाईट बंद करत आहेत, असे



बोलले जात आहे.

मंगळवारी सकाळी १०.३० ला वीजपुरवठा बंद करण्यात आला. तो दुपारहून ४ नंतर सुरू झाला. तीच अवस्था गुरुवार, शुक्रवार आणि शनिवारीची होती. शनिवारी सकाळी ९.४५ ला वीजपुरवठा खंडित करण्यात

- **गरज नसताना दुरुस्तीची काम जोरात सुरू**
- **दिवसभरात चार-चार तास वीजपुरवठा होतोय खंडित**

आला, तो ४.३० वाजले तरी सुरू करण्यात आला नव्हता. त्यामुळे याच्या मुळाशी आमचे प्रतिनिधी गेल्यावर असे लक्षात आले की, पेण येथील महावितरणच्या अभियंत्यांचे आणि लाईट तारा,

पान २ वर




# परतीच्या पावसाचा भातपिकाला धोका

## उत्पादन घटण्याच्या भीतीने शेतकरी चिंतेत

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

**सूर्याचा हस्त नक्षत्रात प्रवेश होण्यापूर्वी पासूनच तीनचार दिवसाआधी उत्तरा नक्षत्राच्या पावसाने मुरुड तालुक्यात पावसाला प्रारंभ केला. एवढेच नव्हे तर, गेले चार पाच दिवस पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. यामुळे भातशेतीत तयार होत असलेल्या यावर्षीच्या भातपिकाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता काही शेतकऱ्यांनी बोलून दाखवली.**



मुरुड तालुक्यातील एकूण ३२१० हेक्टर जमिनीवर भातलागवड करण्यात आली असून, आतापर्यंत ३००७ मि.मी.च्या आसपास पाऊस झाला आहे. तो तालुक्यातील एकूण सरासरी पावसापेक्षा जास्त आहे. सुरुवातीचा काळ सोडल्यास यावर्षी पावसाने कमालीचे सातत्य दाखवल्याने तसेच ऐन दाणे भरण्याच्या काळात आवश्यक असा पाऊस झाल्याने यावर्षी भाताचे उत्पादन चांगले येणार असल्याचे संकेत मिळत होते. सद्यःस्थितीत लवकर पिकणाऱ्या भाताच्या कणसांमध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत अनेक ठिकाणची भातशेती आहे. तर काही ठिकाणचे भातपीक फुलोऱ्यात आहे. मात्र, गेले चार दिवस सतत मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे भातपिकाचे फूल झडून गेल्यास असे दाणे पोकळ राहण्याची शक्यता असते. शेतकऱ्यांच्या भाषेत त्याला पोल पकडणे असे म्हटले जाते. नुकत्याच झालेल्या पावसामुळे फूल झडून गेल्याने यावर्षी असे संकट शेतकऱ्यांवर आले आहे. उत्तरा नक्षत्राच्या पावसाला परतीचा पाऊस असे म्हटले जाते. या पावसाचे पाणी थंड व जड असल्याने लोंब्या पकडलेली चिंब भिजलेली भाताची रोपे कोलमडून पडतात. बुंध्यातून मोडतात. परिणामी, रोपावरील दाणे भरत नाहीत व शेतकर्यांचे मोठे नुकसान होते अशी माहिती खारआंबोली, शिघ्रे, विहूर, नांदगाव, मजगाव, काशीद, बारशिव बोर्ली, भागातील शेतकऱ्यांनी दिली.सकाळी कडक ऊन तर सायंकाळी मुसळधार पाऊस अशी मुरूड तालुक्यात पर्जन्यवृष्टी होत आहे.शनिवारी तहसील सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार तालुक्यात एकून ३००७ मिमी पाऊस पडला आहे. पावसाने मासेमारीची देखील दाणादाण उडविली असून, नौका किनाऱ्यावर परतलेल्या दिसून येत आहेत. सायंकाळी किंवा रात्री पावसाचा जोर वाढत आहे. सतत पर्जन्यवृष्टीमुळे बाजारपेठा थंडवल्या आहेत.

दरम्यान, लवकर पिकणाऱ्या भाताची खाचरे या जोरदार पावसामुळे भरुन गेल्यामुळे काही ठिकाणच्या भात खाचरातील पिके चिखलात पडल्याने तसेच कापणी केलेले पीकही पाण्यात राहिल्याने दाण्यांना मोड येऊन नुकसान होण्याची संभावना आहे. आता परतीच्या या पावसाने विश्रांती घेतली तर यापुढे चांगल्या उन्हाची प्रतीक्षा येथील शेतकऱ्यांना आहे. तरच वेळेत तयार पिकांची कापणी व मळणी ते करु शकतील.

# शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ८१४ कोटी जमा होणार

## आंबिया बहार हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

आंबिया बहार २०२३-२४ हंगामासाठी आत्तापर्यंत निर्धारित झालेली ८१४ कोटी रुपये नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर विमा कंपनीमार्फत लवकरच जमा करण्यात येईल, अशी माहिती कृषी आयुक्त कार्यालयाने दिली आहे.

फळपिकांना हवामान धोक्यापासून विमा संरक्षण दिल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत होईल, या हेतूने राज्यात हवामान आधारित फळ पीक विमा योजना राबविण्यात येते. कमी-जास्त पाऊस, कमी-जास्त तापमान, आर्द्रता, वेगाचे वारे, अवकाळी पाऊस, गारपीट अशा विविध हवामान धोक्यांमुळे फळ पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. याबींचा विचार करून राज्यात आंबिया बहारमध्ये संत्रा, मोसंबी, काजू, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष, स्ट्रॉबेरी, पपई या नऊ फळपिकांसाठी म हसूल मंडळ स्तरावर ही योजना राबविण्यात येते.

हवामान केंद्राच्या नोंदीनुसार नुकसान भरपाईची रक्कम निर्धारित केली जाते. यात ३५ टक्क्यांपर्यंत एकूण विमा हप्ता असल्यास शेतकरी विमा संरक्षित रकमेच्या साधारण ५ टक्के व उर्वरित विमा हप्ता केंद्रासह राज्य सरकार अनुदान म्हणून भरत असते. ३५ टक्के पुढील विमा हप्ता असेल तर वाढीव विमा हप्त्यात शेतकऱ्यांचा वाढीव वाटा ५० टक्के असतो. आंबिया बहार २०२३-२४ म धील राज्य शासनाचा एकूण विमा हप्ता हा ३९० कोटी रुपये होता. पैकी प्रलंबित विमा हप्ता अनुदान रुपये ३४४ कोटी हे शासनाने मंजूर केले असून, ते विमा कंपनीला दिल्यानंतर केंद्र शासनाचे दुसरा अनुदान विमा कंपन्यांना प्राप्त होईल. या आंबिया २०२३-२४ हंगामासाठी आत्तापर्यंत निर्धारित झालेली नुकसानभरपाई ८१४ कोटी रुपये ही शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर विमा कंपनीमार्फत जमा करण्यात येणार आहे.

# खाने आंबिवली प्रकल्पग्रस्तांचे पिल्लई कॉलेजच्या विरोधात ठिय्या आंदोलन



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील पिल्लई कॅम्पसचे बांधकाम होत असताना खाने आंबिवली तर्फे तुंगारतन गावकऱ्यांना गावातील सर्व मुलांना तसेच परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना मोफत शिक्षण देऊ, असे शाळा प्रशासनाने सांगितले होते. परंतु, कित्येक वर्षे होऊनही कोणत्याही प्रकल्पग्रस्त मुलांना शिक्षणात मोफत सामावून न घेतल्याने स्थानिकांत संतापाचे वातावरण होते.

सदर मागणी पूर्ण करण्याकरिता महाराष्ट्र नवनिर्माण सेना वासांबे विभाग अध्यक्ष विनोद शिंदे यांच्यामार्फत मागील महिन्याभरापासून पाठपुरावा सुरु होता. कोणताही सकारात्मक तोडगा न निघाल्याने पिल्लई शाळा व्यवस्थापनाविरोधात शाळेच्या काही अंतरावर ठिय्या आंदोलन सुरु करण्यात आले.

या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सर्वपक्षीय पदाधिकारी, सामाजिक संघटना, मोठ्या संख्येने ग्रामस्थ व आसपासच्या परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. पिल्लई व्यवस्थापन जोपर्यंत परिसरातील नागरिकांना न्याय देत नाही, तोपर्यंत विविध मार्गांनी आंदोलन सुरुच राहील, असे विनोद शिंदे यांनी सांगितले.

## आ. डावखरेंनी घेतली महावितरणच्या अधिकाऱ्यांची भेट

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील विद्युत समस्यांसाठी मोठे जनआंदोलन उभे राहिले होते. या आंदोलनामध्ये आठदिवसांचेसाखळीउपोषणसुद्धा झाले होते. तालुक्यातील विद्युत समस्यांचा प्रश्न लवकरात लवकर सुटण्यासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. या समस्या लवकरात लवकर सोडवण्यात येतील, असा शब्द महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आ. डावखरे यांना दिला. याप्रसंगी महावितरण जिल्हा अधीक्षक आर.बी. माने, कर्जत कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंदे, तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीचे ॲड. कैलास मोरे आदी उपस्थित होते.

# कर्जत शहरातील रस्ते घेताहेत मोकळा श्वास

## नगरपरिषदेची धडक कारवाई



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहर बचाव समितीच्या वतीने कर्जतच्या विविध समस्यांबाबत कर्जत नगरपरिषदेला बुधवारी निवेदन देण्यात आले होते. आणि, हे निवेदन देत असताना त्या सर्व समस्या सोडविण्यासाठी नगरपरिषदेला दोन दिवस म्हणजे शनिवारपर्यंतचा अवधी देण्यात आला आहे. या चार दिवसांत कर्जत शहर बचाव समितीच्या मागण्या पूर्ण न झाल्यास पुढील आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याचे ॲड. कैलास मोरे यांनी जाहीर केले होते.

त्यामुळे जनआंदोलनाच्या धसका घेतल्यानं यापूर्वी नेहमी नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणारे कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे आणि इतर कर्मचारी कामाला लागल्याचे चित्र आज कर्जत शहरातील रस्त्यावरील अनधिकृत हातगाड्या हटवण्यासाठी पुढे आलेले दिसले.

कर्जत शहरातील बाजारपेठेतील रस्ता गेली अनेक वर्षे हरवला होता. अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत रिक्षा स्टँड, रस्त्यात पार्क केलेल्या अस्ताव्यस्त गाड्या यामुळे ट्राफिकचा प्रश्न गंभीर बनत चालला होता. नागरिकांना बाजारपेठेत चालणेदेखील मुश्किल झाले आहे. सणासुदीला तर बाजारपेठेतील ट्राफिकची समस्या तर अधिकच भयंकर असते.

कर्जत शहर बचाव समितीच्या आंदोलनाच्या एक दिवस आधीच कर्जत बाजारपेठेतील वाहतूक वन-वे करण्याचे फलक लावण्यात आले होते. तसेच दि.२६ कर्जत नगरपरिषदेच्या वतीने अनधिकृत टपऱ्या हटविण्याचे काम सुरू केल्याने थोड्या प्रमाणात का होईना कर्जत बाजारपेठेतील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे. नगरपरिषदेचे कर्मचारी अनधिकृत टपऱ्या आणि बोर्ड हटवण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन दखल झाली तेव्हा ही कारवाई किती दिवस करणार, का फक्त वेळ मारण्यासाठी केलेला प्रयत्न तर नाही ना, अशी चर्चा नागरिकांमध्ये होती.

> **कर्जत नगरपरिषदेने कर्जत बाजारपेठेतील अनधिकृत टपऱ्या हटवून रस्ता मोकळा करण्यासाठी सुरू केलेल्या कारवाईचे आम्ही स्वागत करतो; परंतु ही कारवाई तात्पुरती करून चालणार नाही, तर ती कायमस्वरुपी असली पाहिजे.**
> **– कर्जत शहर बचाव समिती**

## पान १ वरून

पान १ वरून

### राजकीय गुंडांची गोची

शनिवारी (दि. २८) मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेत विधानसभा निवडणुकीचा आढावा घेतला.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पथकाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर राज्यात दौरा केला. यावेळी त्यांनी राज्यातील ११ राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. त्याचबरोबर राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, जिल्हा अधिकारी यांच्याकडून तयारीचा आढावा घेतला, अशी माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार पत्रकार परिषदेत दिली. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, महाराष्ट्रात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी आम्ही येथे आलो आहोत. आम्ही या दौऱ्यादरम्यान राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. आम्ही भागधारक, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि डीजीपी यांची भेट घेतली. आम्ही बसपा, आप, सीपीआय (एम), काँग्रेस, मनसे, सपा, शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना अशा एकूण ११ पक्षांच्या नेत्यांची भेट घेतली. त्यांनी निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्यापूर्वी दिवाळी, देव दिवाळी आणि छठपूजा यासारख्या सणांचा विचार करावा, अशी सूचना केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपणार आहे. त्यापूर्वी निवडणुकीची प्रक्रिया करावी लागणार आहे, असे त्यांनी सांगितले. आगामी काळात राज्यात दिवाळी, दसरा यासारखे मोठे सणवार येत आहेत. त्यामुळे निवडणुकांची तारीख जाहीर करताना याचा विचार करण्यात यावा. सण, उत्सव लक्षात घेऊन निवडणुकांच्या तारखांची घोषणा करण्याची विनंती पक्ष नेत्यांनी केल्याचे त्यांनी सांगितले.

पैशांचा वारेमाप होणारा वापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. मतदान केंद्रात मोबाईल नेण्यास मनाई करण्यात यावी. आठवड्याच्या मधल्या काळात निवडणूक घेण्यात याव्यात. फेक न्यूज रोखण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी. मतदान केंद्रावर सोयी-सुविधा देण्यात याव्यात. वृद्ध मतदारांना मतदान केंद्रात जाण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी, अशा महत्त्वपूर्ण सूचना राजकीय पक्षांनी केल्याचे राजीव कुमार यांनी सांगितले..

#### दारुपार्टी, पैसेवाटपावर करडी नजर

दरम्यान निवडणूक आयोगाची दारुपार्टी-पैसेवाटपावर करडी नजर असणार आहे. विविध निवडणुकांआधी मतदारांना प्रलोभने देऊन त्यांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला जातो. महिलांना साड्या, पुरुषांना दारु-पैसे दिले जातात. मात्र, आता अशा प्रकारांवर निवड आयोगाची करडी नजर असणार आहे.जिथे पैसे, दारू, गिफ्ट दिले जात असतील, तर त्यावर कठोर कारवाई होणार. आम्ही या वाटपावर अधिक लक्ष देणार, असं राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं आहे.

### सीतारामन यांच्यावर खंडणीचा आरोप

लोकप्रतिनिधींच्या विशेष न्यायालयाने निर्मला सीतारामन यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. टिळक नगर पोलीस आता निर्मला सीतारामन आणि इतरांविरोधात एफआयआर दाखल करणार आहेत.

केंद्राने २०१८ मध्ये निवडणूक रोखे (इलेक्टोरल बाँड योजना) सुरू केली होती. दरम्यान, या योजनेचा उद्देश राजकीय पक्षांना दिलेल्या रोख देणग्या बदलणे हा होता. जेणेकरून राजकीय निधीमध्ये पारदर्शकता सुधारली जावी. राजकीय पक्षांना इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून निधी दिला जात होता. मात्र, याचा खुलासा करण्यात आला नाही. मात्र, नंतर विरोधकांनी केलेले आरोप आणि याचिका पाहता सर्वोच्च न्यायालयाने ते रद्द केले.

### महावितरणचे अधिकारी ठेकेदारांवर फिदा

पोल बदलणाऱ्या ठेकेदारांचे काही हितसंबंध आहेत. ठेकेदाराचे भले करण्यासाठी कनिष्ठ अभियंते वीजपुरवठा बंद करीत आहेत. अशा अधिकाऱ्यांविरुद्ध वरिष्ठांनी त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु, वरिष्ठ अधिकारीदेखील कानाडोळा करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, वीजपुरवठा का बंद केला, याबाबत विचारणा करण्यासाठी पेण उपअभियंता खोबरागडे यांना भ्रमणध्वनीवरुन संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मला माझ्या अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी लागेल. याचाच अर्थ, कनिष्ठ अभियंते आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कोणतीच कल्पना देत नाहीत. स्वतःच्या मनमानीने ते ठेकेदारांच्या भल्याचाच विचार करीत आहेत, अशी जोरदार चर्चा आहे.

### सेफ्टी झोनचं संकट

येऊन ठेपण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्र सरकारने १६ मे १९९२ रोजी अध्यादेश जारी करुन उरण परिसरातील मोरा, हनुमान कोळीवाडा, बोरी-पाखाडी, केगाव, म्हातवली या तीन गावांतील महसुली हद्दीतील आणि उरण शहरातील सुमारे २७१ हेक्टर क्षेत्रातील शेती, बिनशेती जमिनींवर करंजा येथील नौदल शस्त्रागार डेपोसाठी सेफ्टी झोनचे आरक्षण जाहीर केले आहे. या आरक्षणात पूर्वीची आणि नंतरची सुमारे सात हजारांहून अधिक घरे, इमारती येत आहेत. यामध्ये उरण शहरातील विविध शासकीय कार्यालये, न्यायालयाच्या इमारतींचाही समावेश आहे. या सेफ्टी झोन परिसरात ५० हजारांहून अधिक रहिवासी वास्तव्य करीत आहेत. नौदलाच्या सेफ्टी झोनच्या आरक्षणापूर्वी स्वतःच्या मालकीच्या जागेत हजारो गरजू-गरीबांनी राष्ट्रीयीकृत बँका, विविध खासगी वित्तीय संस्थांकडून कर्ज काढून घरे, सहकारी संस्था स्थापन करून इमारती उभ्या केल्या आहेत. मात्र, आता नौदलाच्या आरक्षणापूर्वी, म्हणजे ३५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेली हजारो घरे, सोसायटींच्या इमारती आता जुन्या, जीर्ण झाल्याने धोकादायक बनल्या आहेत. हजारो घरे, शेकडो संस्थांच्या इमारती गळक्या, धोकादायक बनल्या आहेत. अशा धोकादायक घरात, इमारतींमध्ये कुटुंबासह वास्तव करणे म्हणजे जणू काय मृत्यूलाच आमंत्रण देण्यासारखी गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे नौदलाच्या आरक्षणापूर्वी आणि ३५ वर्षांआधी उभारण्यात आलेली हजारो घरे, शेकडो इमारती आणि कुटुंबांचा राहण्याचा आसरा रिडेव्हलपमेंटसाठी संस्था व रहिवाशांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

धोकादायक घरे, इमारती पाडून रिडेव्हलपमेंट करण्यासाठी परवानग्या आवश्यक आहेत. यासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि घरमालकांनी ग्रामपंचायती, नगरपरिषदेचे उंबरठे झिजविण्याला सुरुवात केली आहे. मात्र घरे, इमारती नौदलाच्या सेफ्टी झोनच्या आरक्षणात येत असल्याने घरे, इमारती पाडून रिडेव्हलपमेंट करण्यासाठी परवानग्या देण्यास ग्रामपंचायती, नगरपरिषदेकडून असमर्थता दर्शविली जात आहे. नौदलाकडूनच रिडेव्हलपमेंटसाठी परवानग्या घेण्याच्या सूचनाही ग्रामपंचायती, नगर परिषदेकडून संबंधितांना देण्यात येत आहेत. यामुळे हजारो घरमालक, शेकडो संस्था हवालदिल झाल्या आहेत. आपल्याच मालकीच्या जागेत आरक्षणापूर्वीपासूनच अस्तित्वात असलेली घरे, इमारतींना रिडेव्हलपमेंटसाठी परवानग्या दिल्या जात नसल्याने मात्र पदरमोड करून आपल्या आयुष्याची सर्व पुंजी पणाला लावून कुटुंबासाठी उभारण्यात आलेली घरे, इमारती मात्र सेफ्टी झोनमुळे अनधिकृत ठरू लागली आहेत. यामुळे ५० हजार रहिवासी पार बेजार झाले आहेत.

**नौदलाच्या आरक्षणापूर्वी बांधण्यात आलेली घरे, संस्थेच्या इमारती ३५ वर्षांनंतर जुन्या, जीर्ण, धोकादायक झाल्याने त्यांचा पुनर्विकास आवश्यक आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या उनप, ग्रामपंचायतीकडून दिल्या जात नाहीत. विशेष म्हणजे, याआधी परवानग्या, ओसी दिल्यानंतरच नागरिकांनी बांधकामे केली आहेत.**

**- पंकज धारगळकर,** सल्लागार, कृष्ण-सखा को-ऑपरेटिव्ह सहकारी संस्था

**नौदलानेच आरक्षित सेफ्टी झोन परिसरातील बांधकामांना परवानग्या देऊ नयेत असे पत्र नगरपरिषदेला दिले आहे. यामुळे परवानग्या प्रकरणे अभिप्रायासाठी युडीकडे पाठविण्यात येत आहेत.**

**- निखिल ढोरे,** रचनाकार, उनप

**याबाबत सिडको, जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती उनप मुख्याधिकारी समीर जाधव व केगाव सरपंच जगजीवन नाईक यांनी दिली.**

## मोहोपाड्यात मोफत नेत्रतपासणी शिबीर

**। रसायनी । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आर सुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा येथील गणपती मंदिराच्या सभामंडपात शुक्रवार, दि. २७ रोजी मोफत नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर पार पडले. या शिबिराचा ५२ रुग्णांनी लाभ घेतला. यातील २० रुग्णांना मोतिबिंदूचा आजार असल्याचे दिसून आले. त्यांच्यावर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. यावेळी आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. अश्विन पवार, डॉ. प्रकाश पाटील यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच उमा मुंढे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन थोरात, सचिव ऋतुजा भोसले आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान उत्साहात



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा पंचायत गणाचे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अभियानांतर्गत सबकी योजना सबका विकास मोहीम नागाव ग्रामपंचायत सभागृहातमध्ये राबविण्यात आली.

नागाव ग्रुप ग्रामपंचायत व पंचायत समिती अलिबाग यांच्या विद्यमाने सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य व इतर सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांचे गणस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रेवदंडा पंचायत गणातील नागाव ग्रुप ग्रामपंचायत व रेवदंडा ग्रामपंचायतीचा सहभाग होता.

या गणस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमास प्रभारी अधिकारी पं.स. अलिबाग बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता नूतन माने व पर्यवेक्षक अलिबाग पं.स. समूह समन्वयक इच्छा सचिन नाईक यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन होते. यामध्ये नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागवेकर, रेवदंडा ग्रा.पं. सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच मंदा बळी, नागाव ग्रा. पं. अधिकारी श्वेता कदम, रेवदंडा ग्रा.पं. अधिकारी समीर म्हात्रे, रेवदंडा ग्रा.पं. सदस्य सुराराम माळी तसेच नागाव व रेवदंडा ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती.

# विज्ञान प्रदर्शनातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुका गणित संबोध व तालुका विज्ञान प्रदर्शनात उज्ज्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.



कोएसो मेहेंदळे हायस्कूल रोहा येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून के.आर. पाटील, नारायण पानसरे, संग्राम गायकवाड, रा.जि. कार्यकारिणी स्पर्धा समिती प्रमुख विलासराव जाधव, गणित विज्ञान मंडळ अध्यक्ष टिळक खाडे, एस.आय. ठाकूर, भिवा कोकरे, संगिता धामणसे, श्रद्धा पाटील, संगिता धामणसे, मनीषा पाटील, कलावती काटले आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत मोठा गट निबंध स्पर्धा प्रथम क्र. रीनशा उत्साद अंजूमन हाय. रोहा, द्वितीय क्र. अश्लेषा सानप एमपीएसस कोलाड, तृतीय क्र. इस्लम दुकानदार रोहा पब्लिक, वक्तृत्व स्पर्धा प्रथम क्र. जान्हवी बिरगावले तिसे हाय., द्वितीय क्र. स्वरा नांदगावकर एमबी मोरे वरसे, तृतीय क्र. रुचिता मांडलेकर सानेगाव हाय., प्रश्नमंजुषा प्रथम क्र. प्रेक्षा यादव एमडीएन वरसगाव, द्वितीय क्र. पार्थ भोईर कोलाड हाय., तृतीय क्र. अनु शर्मा ज्युनि. कॉलेज नागोठणे, तर शिक्षक प्रतिकृती प्रथम क्र. मनिषा पाबरेकर न्हावे, द्वितीय क्र. टिळक खाडे वांगणी यांनी पटकावले. तर, छोटा गट निबंध स्पर्धा प्रथम क्र. आर्या जाधव एमपीएसएस कोलाड, द्वितीय क्र. निष्ठा मातिकरे एमडीएन वरसगाव, तृतीय क्र. सरिता धनसे, प्रा. शाळा खैरे खु., वक्तृत्व स्पर्धा प्रथम क्र. मंजिरी तांबोळी पीएनपी पळस, द्वितीय क्र. दिशा हळदे चिल्हे हाय., तृतीय क्र.अक्षरा गोरिवले तिसे हाय., प्रश्नमंजुषा प्रथम क्र. वैदेही म्हात्रे नागोठणे हाय., द्वितीय क्र.श्रावणी शिंदे एमडीएन वरसगाव, तृतीय क्र. मानस धुमाळ वि.ना.पंडित रोहा तर प्रतिकृती स्पर्धा प्रथम क्र. श्रावणी शिंदे एमडीएन वरसगाव, द्वितीय क्र. काव्य मिसाळ नागोठणे हाय,तर तृतीय क्र.चैतन्य पांचाळ मेहेंदळे हाय.यांनी पटकावले आहेत. तसेच गणित संबोध परीक्षेत इ.५ वी गट प्रथम क्र. ढाकणे गार्गी बाळासाहेब प्रा.शाळा कोलाड, बेजगमवार प्राची संगम रोहा न.पा. शाळा क्र.९ काळे नेहा सुनील मेहेंदळे हाय.रोहा, द्वितीय क्र. तेलंगे आकृती एकनाथ शाळा कोलाड व तुरबाडकर समर्थ स्वप्निल रोहा न.पा. शाळा क्र.९ तर इ.८ वी गट प्रथम क्र. रेवाळे मोहित मंगेश आरे हाय., चितळकर जान्हवी महेंद्र नागोठणे हाय., द्वितीय क्र.सावंत रूद्र विजय केईएस रोहा, मोंडे स्वयंम् मिलिंद आर्दीनी पटकावले.

# नवरात्रोत्सव शांततेने साजरा करा : कदम

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**



नवरात्र उत्सव हा सार्वजनिक असल्यामुळे मोठ्या उत्सहाने साजरा होत असला तरीसुद्धा या माध्यमातून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांच्या माध्यमातून खालापूर तालुक्यातील पोलीस पाटील यांना नवरात्र उत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, मूर्ती विटंबना होणार नाही, यासाठी २४ तास स्वयंसेवक नेमण्यात यावेत. तसेच मंडप मजबूत असावे, मंडपामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावे, कायदेशीर विद्युत जोडणी असावी, ऑनलाइन परवानगी अर्ज करावा, तसेच संबंधित विभागाच्या परवानगी घ्यावी, गरबा दांडिया खेळताना मुलींची छेडछाड, विनयभंग, चोरी, मद्य प्राशन करून गरबा खेळणे, जातीय, धार्मिक तेढ निर्माण होणारे बॅनर, देखावे, चित्रफिती प्रसारित करू नये. याबाबत मंडळानी दक्षता घ्यावी, तसेच स्वयंसेवक नेमवावे, अशा सूचना केल्या.

**निवडक**

## अनिल दाभाडे यांचा सन्मान

**रसायनी :** सुप्रसिद्ध कवी, लेखक, चारोळीकार, पक्षी निरीक्षक, निवेदक, प्रकाश योजनाकार अशा विविध नावाने ओळखले जाणारे कवी अनिल दाभाडे यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद धुळे जिल्हा साहित्य समूहाने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिनी राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धा राष्ट्र निर्माता शिक्षक या विषयावर आयोजित केली होती. या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत उत्कृष्ट काव्यलेखन केल्याबद्दल काव्यसम्राट पुरस्कार देऊन गौरविले.

## जय भारत ग्रामसंघाचे स्नेहसंमेलन

**पाली/गोमाशी :** गोमाशी येथे जय भारत ग्रामसंघाचा तृतीय वार्षिक स्नेहसंमेलन अकरा बचत गटातील महिलांनी उत्साहात साजरा केला. यानिमित्त प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गोमाशी ग्रामपंचायत सदस्यां सुवानी जंगम, सुलभा उतेकर, प्रिती कानाडे , दीप्ती उफाले, उर्मिला मगर, वैदही उतेकर, कोषाध्यक्ष राजश्री खैरे तसेच ग्रामपंचायत गोमाशी मधील सर्व बचत गटांचे अध्यक्ष, सदस्य महिला आदी मान्यवर उपस्थित होते.

## खांब येथे कृषी प्रदर्शन

**खांब :** डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषी संजीवनी गटाने खांब गावात कृषी प्रदर्शन घेण्यात आले. यावेळी विठ्ठल मंदिरामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या वेळी एकूण ५४ शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमात डॉ. राजेश मांजरेकर, डॉ. प्रमोद मांडवकर, रामचंद्र चितळकर, ग्रामसेविका मोनिका फडके व ग्रापंचायत सदस्य तसेच इतर ग्रामस्थांद्वारे सहभाग नोंदविला.

## विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**खांब :** रोहा शहरातील नगर पालिका शाळेमध्ये अभियंता दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेले विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. धाटाव औद्योगिक वसाहतीमधील नामांकित दीपक नायट्रेट कंपनी व दीपक फाऊंडेशन रोहा यांच्या वतीने स्टेम प्रकल्प अंतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी नगरपरिषद सीईओ पंकज भुसे, रामचंद्र नाकती आदी उपस्थित होते. प्रदर्शनामध्ये १०७ मुलांनी विशेष सहभाग दर्शवून विविध वैज्ञानिक विषयावर ४९ मॉडेल्स सादर केले.

## एनएसएस दिन साजरा

**म्हसळा :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने आणि स्वच्छता ही सेवा-२०२४ अभियानाच्या अंतर्गत, वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालय, म्हसळा येथे दोन दिवस विशेष उपक्रम आयोजित करण्यात आले. २३ सप्टेंबरला विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली, ज्यात स्वच्छतेचे महत्त्व आणि समाजात स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला.

### भौतिक सुविधा पुरविताना शिक्षकांची कसरत

# संयुक्त शाळा अनुदान तुटपुंजे

*** मंजूर निधीपैकी फक्त ५० टक्के निधी वर्ग; शाळांना अनुदानाची प्रतीक्षा कायम**

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

**जिल्हा परिषद शाळेतील भौतिक सुविधांसाठी शासनाकडून संयुक्त शाळा अनुदान दिला जातो. रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाला सुमारे चार कोटी ६६ लाख रुपयांचा हा अनुदान शासनाने मंजूर केला होता. परंतु शासनाकडून फक्त ५० टक्के अनुदान देऊन बोळवण करण्यात आली आहे. दोन कोटी २७ लाख रुपयांचा तुटपुंजा निधी वितरीत करताना शिक्षण विभागाला तारेवरची कसरत करावी लागणार असून हा निधी खर्च करताना शिक्षकांसमोर मोठे आव्हान उभे राहणार आहे.**



शाळेतील गुणवत्ता वाढीबरोबरच विद्यार्थी संख्या वाढावी, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबिवले जातात. समग्र शिक्षा अंतर्गत पटसंख्येनुसार शाळांना भौतिक सुविधांच्या खर्चासाठी संयुक्त शाळा अनुदान शासनाकडून दिला जातो. तीस पर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांना दहा हजार रुपये, शंभरपर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांना २५ हजार रुपये २५० पटसंख्या असलेल्या शाळांना ५० हजार रुपये व एक हजार पटसंख्या असलेल्या शाळांना ७५ हजार रुपये दिले जातात.

रायगडजिल्ह्यामध्येजिल्हापरिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या दोन हजार ५२८ शाळा असून या शाळांमध्ये पाच हजार ५४५ शिक्षक आहेत. शिक्षकांच्या माध्यमातून ९१ हजार ३४३ विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केले जाते. जिल्ह्यात वीसपर्यंत पटसंख्या असलेल्या शाळा एक हजार २३८ असून या शाळांमध्ये १२ हजार ८८१ विद्यार्थी आहेत.

जिल्हा परिषद शाळांना संयुक्त शाळा अनुदान देण्यासाठी शासनाकडून चार कोटी ५६ लाख, दहा हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी फक्त शासनाकडून दोन कोटी २७ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे देण्यात आला आहे. मंजूर निधीपैकी फक्त ५० टक्के निधी शासनाकडून मिळाल्याने शाळांना निधी वितरीत करताना शिक्षण विभागाची मोठी पंचाईत झाली आहे. दहा हजारच्या जागा पाच हजार, २५ हजारच्या जागी साडेबारा हजार रुपयांचा निधी तालुका गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

शाळेतील स्टेशनरी, लाईट बिल, प्रयोगशाळा, स्वच्छता व इतर भौतिक सुविधा या तुटपुंज्या निधीतून शिक्षक कसा निधी खर्च करणार असा प्रश्न अनेकांकडून उपस्थित केला जात आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने गेल्या दहा दिवसांपुर्वीच तालुक्याला निधी वर्ग केला आहे. परंतु काही तालुका गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून तो निधी शाळांपर्यंत अद्याप पोहचला नसल्याचे माहिती उपलब्ध होत आहे. निधी अभावी भौतिक सुविधा पुरविताना शिक्षकांना अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे शाळांना संयुक्त शाळा अनुदानाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. याबाबत शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांच्याशी संपर्क साधला, मात्र तो होऊ शकला नाही.

> **“यावेळी ५० टक्के अनुदान आला आहे. एक ते तीस पटाच्या शाळांपर्यंत पाच हजार रुपये अनुदान आले आहे. या तुटपुंज्या अनुदानामुळे शाळेत भौतिक सुविधा उपलब्ध करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सरकारने हा निधी वाढवून दिला पाहिजे.**
> **– प्रमोद भोपी, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ”**

## जयंत पाटील यांची सांत्वनपर भेट

**रघुनाथ पाटील यांच्या कुटुंबियांची केली विचारपूस**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ढवर येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय सहभाग घेणारे हरहुन्नरी, मनमिळाऊ सर्व क्षेत्रात हिरिरीने सहभाग घेणारे रघुनाथ विष्णू पाटील यांचे सर्पदंशाने निधन झाले. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी गुरुवारी ढवर येथे जाऊन रघुनाथ पाटील यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन विचारपूस केली.



रायगड जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व केलेले रघुनाथ पाटील हे नूतन हनुमान क्रीडा मंडळ ढवर या संघाचे अध्यक्ष होते. त्यांनी अनेक क्रीडांगणे गाजवून मंडळाला अनेक बक्षिसे मिळवून दिली. ते राजकारणात सक्रिय होते. कबड्डी खेळा सोबत ते बैलगाडी व भजन प्रेमीदेखील होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी रघुनाथ पाटील यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी पाटील कुटुंबीय आणि ढवर ग्रामस्थ उपस्थित होते.

## परतीच्या पावसामुळे शेतकरी समाधानी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

खरीप हंगामात म्हसळा तालुक्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात भात, नाचणी, वरी, बांधावरील तुर लागवड आणि थोड्या प्रमाणात भाजीपाला पिक घेतात. तालुक्यात ३८०० ते ४००० मिमी पेक्षा अधिक पर्जन्यमानाची नोंद आहे. २७ सप्टेंबर रोजी म्हसळा तालुक्यात ५३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

यावर्षी आतापर्यंत तालुक्यात एकुण ३६७५ मि.मी.पाऊस पडल्याची नोंद म्हसळा तहीलदारांचे कार्यालयाने नमूद केली आहे. यावर्षीचा पाऊस समाधानकारक झाला असल्याने पिण्याचे पाण्याचा प्रश्न मिटला आहे तर तो खरीप हंगामी शेतीला पूरक आहे.



तालुका कृषी विभागाच्या खरिप हंगामी पीक अहवालानुसार म्हसळा तालुक्यात शेतकऱ्यांनी भात पिकाखालील १९०५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी केलेली आहे. वरकस जमीनीवर करण्यात येणाऱ्या शेतीवर नाचणीची पेरणी २५६.० हेक्टर क्षेत्रावर तर बांधावरील तूर ७.०५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी केली आहे.

खरीप हंगामात रोपवाटिका पेरणी केल्यानुसार भाताची पेरणी १३६.३७ हेक्टर क्षेत्रावर तर नाचणीची पेरणी १४.०६ हेक्टर क्षेत्रावर आहे. तालुक्यात आतापर्यंत पर्जन्यमान चांगले असल्याने लागवड केलेल्या भातशेती, नाचणी आणि तुरीवर कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव झालेला नसल्याचा अहवाल तालुक्यातील कृषी सहाय्यकांनी केलेल्या पाहणी अहवालानुसार तालुका कृषी पर्यवेक्षक सुजय कुसाळकर यांनी माहिती देताना सांगितले.अधिक माहिती देताना परतीच्या पावसाचा म्हसळा तालुक्यात लागवड केलेल्या शेतीला कोणताही धोका झालेला निदर्शनात आलेला नाही. सद्यस्थितीत भाताचे हळवे वाण दाणे भरण्याच्या आवस्थेत आहे तर निमगरवे वाण पोटरी भरण्याच्या अवस्थेत आहे.

पिकांची वाढ चांगली होऊन भात शेतीवर कीड व अन्य रोगांचा प्रादुर्भाव झालेला नाही. शेतकऱ्यांची शेती शाळा व क्रॉपसॅप योजनांच्या माध्यमातून क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत नियमितपणे तपासणी केली जाते. वेळोवेळी शेतकऱ्यांना पीक हंगामात मार्गदर्शन देण्यात येत असल्याचे सुजय कुसाळकर यांनी सांगितले.

## हुतात्मादिन उत्साहात साजरा

**कोलाड :** येरद आदिवासी वाडीध्ये चिरनेर जंगल सत्याग्रहाचे प्रणेते व १९३० चे जंगल सत्याग्रहांमध्ये हौतात्म्य पत्करलेले हुतात्मा नाग्या महादू कातकरी तथा नाग्याबाबा यांचा स्मृतिदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा एकलव्य आदिवासी संघटनेचे जिल्हा सचिव तथा वनमित्र व आदर्श शेतकरी राम कोळी यांच्या हस्ते नाग्याबाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी वनमित्र महिला बचत गटाच्या अध्यक्ष वैदेही कोळी, खजिनदार शकुंतला वाघमारे, सदस्या अस्मिता कोळी, महादेव वाघमारे, एकनाथ वाघमारे, गणेश वाघमारे, अनंत वाघमारे, अरविंद कोळी, कैलास वाघमारे आदी उपस्थित होते.

## शिक्षक पालक सभा संपन्न

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

अशोक लोखंडे विद्यामंदिर पीटसई येथे शिक्षक पालक सभा नुकतीच संपन्न झाली. यावेळी शाळा समितीचे चेअरमन खेळू वाजे, सचिव संजय रेडीज, उपाध्यक्ष गोविंद ठाकर, दामोदर वाघमारे, सदस्य मनोहर गायकवाड, रामचंद्र अडखले, लक्ष्मण मनवल, रामा जगताप, मुख्याध्यापक संतोष रेडीज, नगराध्यक्ष माधुरी घोलप, भास्कर गोळे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शाळा समितीचे चेअरमन खेळू वाजे यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून विशेष मार्गदर्शन करताना सांगितले की, आपला मुलगा अभ्यास करतो की नाही, याची खात्री पालकांनी केली पाहिजे. मुलांनी थोडा वेळ



खेळण्यावर भर दिल्यावर शाळेचा गृहपाठ त्याचबरोबर शाळेत शिकवलेले धड्यावरील प्रश्नोत्तरे पाठ केली तर मुलांना निश्चित चांगले गुण मिळतील. मुलांना चांगले शिक्षण देत असताना पालकांनी मुलांकडे बारकाईने लक्ष देणे सुधा खूप आवश्यक आहे. लवकरच नवरात्र येत असून आम्ही सर्व शाळा समितीचे पदाधिकारी रात्री समयी गावात फिरणार असून आमच्या शाळेतील विद्यार्थी दांडिया खेळताना तिथे दिसला तर त्याला उचित समज देण्याचे काम आम्ही करणार आहोत.

शिक्षक पालक संघटनेच्या उपाध्यक्षपदी नगरसेवक भास्कर गोळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदरील सभेस असंख्य पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी सदरील सभेत इयत्ता पाचवी ते दहावीमधील सर्व विद्यार्थ्यांचे चाचणी परीक्षेचे निकाल वाचून दाखवण्यात आले.

## चित्रलेखा पाटील यांच्याकडून चेरकर कुटुंबियांचे सांत्वन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील आंदोशी येथील जगन्नाथ बाळू चेरकर यांचे मंगळवारी अल्पशा आजारामुळे निधन झाले. शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी गुरुवारी (दि.२६) चेरकर कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांची विचारपूस केली.



यावेळी प्रकाश खडपे, निनाद वारगे आदी शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते व चेरकर कुटुंबिय उपस्थित होते. जगन्नाथ चेरकर यांनी गेली अनेक वर्षे देना बँकेत सेवा केली होती. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर शेती व कृषी व्यवसायाकडे त्यांनी लक्ष देण्यास सुरुवात केली. शेती करीत असताना दुधाचा व्यवसायदेखील चालू ठेवला होता. सामाजिक क्षेत्रातदेखील ते सक्रीय होते. तसेच वारकरी भजनांमध्येही त्यांना आवड होती. एक अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून त्यांची एक वेगळी ओळख होती.

चेरकर यांचे मंगळवारी (दि.१७) अल्पशा आजारामुळे निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात मुली, मुलगा, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

जगन्नाथ चेरकर यांच्या निधनाची माहिती मिळताच शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी गुरुवारी आंदोशी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन चेरकर कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.

## प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

**। माणगाव । वार्ताहर ।**

आपल्या प्रदीर्घ प्रलंबित विविध मागण्यासाठी माणगाव शाखेच्या राज्य सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी जिल्हा परिषद शिक्षक, शिक्षकेत्तर नगरपरिषद, नगरपालिका कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निषेध दिन पाळत देशाचे पंतप्रधान मोदी यांना आपल्या मागण्यांसाठी माणगाव तहसीलदार दशरथ काळे यांच्यामार्फत निवेदन निवेदन दिले. यावेळी राज्य सरकारी कर्मचारी यांनी माणगाव तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली.

राज्य सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी समन्वय समिती, माणगाव शाखा, जिल्हा रायगड येथील अनेक कर्मचारी या निदर्शनात सहभागी



झाले होते. अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या निर्देशानुसार देशातील राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांच्या महत्वाच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी निदर्शने करण्यात आली.

यावेळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तालुका अध्यक्ष राजेंद्र खाडे, मध्यवर्ती संघटना तालुका चिटणीस दाडेल, तुषार सुर्वे, महसूल संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष भूषण पाटील, तालुका अध्यक्ष परमेश्वर खरोडे, बागुल, भारती पाटील. मुकणे, उतेकर यांच्यासह अनेक कर्मचारी यांनी दर्शनास सहभागी झाले होते.

पीएफआरडीए कायदा रद्द करुन सर्व कर्मचारी आणि शिक्षकांना जूनी पेन्शन लागू करा, डीसीपीएस एनपीएस मधील जमा असलेले कर्मचारी, शिक्षकांचे १० टक्के अंशदान व्याजासह परत करा, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करा, कंत्राटी, बाह्यस्त्रोत आणि रोजंदारी पध्दत बंद करण्यात यावी. मंजूर पदे निरसीत करु नका, राज्य व केंद्र सरकारी विभाग आणि सार्वजनिक उपक्रमांतील सर्व रिक्त पदे नियमितपणे भरा, केंद्र व राज्य शासनाच्या अखत्यारीतील अणि सार्वजनिक संस्थामधील खाजगीकरण थांबवा, आठव्या केंद्रीय वेतन आयोगाचे त्वरीत गठन करा व या पुढे पाच वर्षानी वेतन सुधारणा करा, कोविड काळातील रोखलेली महागाई भत्त्याची थकबाकी अदा करा, सरकारी कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना कॅशलेस उपचार मिळावेत. त्यासाठी सर्व समावेशक आरोग्य विमा योजना लागू करा, अशा विविध प्रलंबित मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी निदर्शने केली.

## किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन

**पाताळगंगा :** औद्योगिक करणामुळे शेती कमी झाली असून शेतीचे विभाजन होवून तुकड्यामध्ये रुपांतर झाली आहे. यामध्ये भातशेतीच्या समवेत विविध पिके घेण्याचे ज्ञान विकसित व्हावे तसेच शेतीचे क्षेत्र वाढावे यासाठी रामेती खोपोली येथे तालुका कृषी अधिकारी खालापूर कार्यालयामार्फत तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अंतर्गत शेतकऱ्यांकरिता किसान गोष्टी कार्यक्रम आयोजित करण्यात आले.यावेळी शेकडो शेतकरी बांधवांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. भात शेतीच्या समवेत बांबूचे प्रकार व लागवड,आंबा लागवड व व्यवस्थापन,भात व आंबा पिक विमा, गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजना या विषयी मार्गदर्शन करण्यांत आले.

### लोकप्रतिनिधींनी संरक्षक भिंत उभारण्यासाठी घ्यावा पुढाकार

# माथेरानच्या झोपडपट्टीला गरज सुरक्षा कवचाची

**। माथेरान । वार्ाहर ।**

माथेरान झोपडपट्टी भागात राहणाऱ्या लोकांच्या झोपड्या ह्या काळानुसार पक्क्या स्वरूपात बांधलेल्या असून कड्यालगतच्या जमिनीवर भार वाढलेला आहे. काही ठिकाणी मुरुमाच्या मातीच्या जुन्या ढिगाऱ्यावर सुध्दा घरे बांधलेली आहेत. त्यामुळे अतिवृष्टीत या घरांना नगरपरिषदेच्या मार्फत पावसाळ्यात अन्य सुरक्षित स्थळी आपला मुक्काम करावा या आशयाच्या नोटीस बजावल्या जातात. अतिवृष्टीमुळे एखाद्या भागाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यासाठी संरक्षण भिंती उभारणे गरजेचे बनले आहे.



माथेरानमध्ये वाढती लोकसंख्या लक्षात घेता साधारण पाच दशकापूर्वी इथे झोपडपट्टीची स्थापना झाली होती. त्यावेळी मिळेल त्या ठिकाणी पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांनी आपल्या झोपड्या उभारून कुटुंबासह राहू लागले होते. परंतु मागील पंधरा वर्षापासून या ठिकाणी झोपडपट्टीचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरलेले असून कड्यालगत सुध्दा अत्यंत धोकादायक ठिकाणी परिसरातून व्यवसायासाठी आलेल्या लोकांनी राजकीय वरदहस्ताने जंगले नष्ट करून आता कायमस्वरूपी झोपड्या अर्थातच बांधून वास्तव्य करत आहेत.झोपडपट्टीचा पसारा इतका वाढला आहे की लोकांनी गल्लीबोळे सुध्दा व्यापलेली असून अंत्ययात्रेला जाण्यासाठी जागा शिल्लक ठेवलेली नाही. त्यामुळे आपसूकच त्या-त्या भागात अस्वच्छता आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे.

आपल्या पक्षाला मते मिळावीत यासाठी इथे नव्याने वास्तव्यास आलेल्या लोकांची अन्य ठिकाणी मतदार यादीत नावे असताना सुध्दा इथल्या मतदार यादीत काही राजकीय पक्षांच्या मंडळींनी नावे नोंदवली असल्याचे बोलले जात आहे.शेवटी भारतीय नागरिकाला देशात कुठेही व्यवसाय आणि वास्तव्य करता येऊ शकते हे जरी खरे असले तरी सुद्धा या छोट्याशा गावात सद्यस्थितीत स्थानिक भूमिपुत्र गाव सोडून अन्य ठिकाणी वास्तव्यास जात असल्याचे विदारक चित्र निर्माण झाले आहे कारण परिसरातून आलेल्या अन्य राज्यातील लोकांनी आपले पाय घट्ट रोवले आहेत.

मागील काळात आमदार निधीतून काही भागात संरक्षण भिंती उभारल्या गेल्या आहेत. तर काहींनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात नगरपरिषदेच्या माध्यमातून संरक्षण भिंती स्वतःच्या वास्तूच्या संरक्षणासाठी बांधलेल्या आहेत. त्याच धर्तीवर येथील धोकादायक घरांच्या संरक्षणासाठी सुरक्षा कवच म्हणून आरसीसी बांधकामामध्ये भिंत उभारल्यास लोकांना संरक्षण मिळू शकते.

## कर्जत तालुक्यात चोरीच्या घटनेत वाढ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील किरवली ग्रामपंचायतीमधील ज्ञानदीप सोसायटीमधील दोन बंगल्यांमध्ये चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्याबाबत पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल झाल्या असून सोन्या चांदीचे दागिने आणि काही रोकड चोरट्यांनी लंपास केली आहे.

किरवली ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या ज्ञानदीप सोसायटी येथील दोन बंगल्यात घुसून अज्ञात चोरट्यांकडून चोरी करण्यात आली. ज्ञानदीप सोसायटी येथील जया रेडकर यांच्या बंगल्याची खिडकी तर अर्जुन राणे यांच्या बंगल्याच्या दरवाज्याची लॉकची कडी तोडून आतमध्ये शिरकाव करीत या दोन्ही बंगल्यातून सोने, चांदी यांसह रोख रक्कम घेऊन चोरटे लंपास झाले.

जया रेडकर यांचा श्रद्धा बंगला असून त्या संध्याकाळी त्यांच्या क्लिनिकमधून ज्ञानदीप सोसायटी येथे बंगल्यावर आल्यानंतर घरातील सर्व कामे उरकून अंदाजे आठ वाजण्याच्यासुमारासनातेवाईकांकडे गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ज्ञानदीप सोसायटी येथील बंगल्याकडे आल्यानंतर त्यांच्या बंगल्याची समोरील खिडकी ही उघडी असल्याचे पाहिल्यानंतर त्या मुख्य दरवाजा उघडून आत गेल्या असता बेडरूममधील सर्व सामान व साहित्य हे अस्ताव्यस्त झाल्याचे पाहिले. जया रेडकर यांचे सोने, चांदी व रोख रक्कम चोरीला गेली असल्याची माहिती रेडकर यांच्याकडून सांगण्यात आली आहे.

अर्जुन राणे यांच्या मालकीचा बंगला असून गेल्या १० वर्षांपासून ते या ठिकाणी राहत असून त्यांचा स्वतःचा हॉटेल व्यवसाय आहे. ते नेहमीप्रमाणे हॉटेलवर गेल्यानंतर काम उरकून १० वाजता घरी परत आल्यावर त्यांनी बंगल्याचे गेट उघडून दरवाजाजवळ गेलेअसता दरवाजाच्या लॉकची कडी तुटलेल्या अवस्थेत आढळली. त्यानंतर दरवाजा ढकलला असता उघडला नाही म्हणून मागच्या दरवाजाने घरात शिरून पाहिले असता घरात काहीतरी प्रकार घडल्याचे लक्षात आले म्हणून बंगल्यातील सर्व बेडरूम चेक केले असता आतमध्ये असणाऱ्या कपाटाचे लॉकर तोडून त्यातील सोने, चांदी यांसह रोख रक्कम चोरट्यांनी चोरी करून मागच्या दरवाजाने प्रसार झाले. कर्जत तालुक्यात दिवसेंदिवस चोरीच्या घटनेत वाढ होत असून चोरांच्या मुसक्या आवळण्याचे कर्जत पोलिसांसमोर आव्हान असणार आहे.

# पतसंस्थांना ठेवींवर विमा संरक्षण मिळाले पाहिजे

## सहकार भारती राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**कपूर समितीच्या अहवालानुसार आर्थिक संस्थांच्या ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था हवी, त्यासोबत १०० टक्के भागभांडवल पुरविण्याचे दायित्व हे सरकारने स्विकारले तरच आर्थिक क्षेत्रातील सहकारात मोठ्या संख्येने कार्यरत पतसंस्थांना उर्जितावस्था लाभेल. बँकाप्रमाणे पतसंस्थाना देखिल ठेवींवर विमा सरंक्षण मिळाले पाहिजे, अशी आग्रही मागणी सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी केली.**



अलिबाग येथील आदर्श भवन येथे आयोजित रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित अलिबागच्या २५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेत मार्गदर्शन करताना डॉ. जोशी बोलत होते.

आपल्या भाषणात डॉ. जोशी पुढे म्हणाले की, राज्यात १३ हजार ४५१ पतसंस्थांच्या माध्यमातून ५६ हजार कोटींच्या ठेवींना विमा सरंक्षण देण्यासाठी १० वर्षात परतफेडीच्या अटीवर राज्य शासन अवघे १०० कोटी रुपये देऊ करते. ही रक्कम अतिशय तुटपूंजी असल्याने राज्य शासनाने सहकार क्षेत्राला झळ-ाळी देण्यासाठी पुर्नविचार करण्याचे सुचित करून नियामक मंडळात राजकीय शक्तींचा हस्त-क्षेप टाळावा, असा सल्ला दिला.

या वेळी व्यासपीठावर महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे . टी .पाटील, सचिव योगेश मगर, राज्य फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, दिलीप पटेल, जगदीश कवळे, अमित ओझे, प्रमोद पाटील, चंद्रकांत घोसाळकर, प्रकाश चांदीवडे गणेश म्हात्रे, संजय वानखेडे, उषा चांदगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम पत्रिकेचे वाचन सचिव योगेश मगर यांनी केले. पतसंस्थांचा महासंघ जिल्ह्यातील पतसंस्था संचालक व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग तसेच सहकार आयुक्तांकडून आलेल्या आदेशांच्या प्रतिपूर्तीसाठी पतसंस्थांना नेहमी मागदर्शन करीत असतो. तसेच १०१ प्रकरणातील वसुलीसाठी यंत्रणा ही राबवित असल्याची माहिती देत जिल्ह्यातील पतसंस्था सदस्यांनी येणे वर्गणी भरून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

रायगड जिल्ह्यातील बहुसंख्य पतसंस्थांचे पदाधिकारी महासंघाच्या सभेस उपस्थित होते.

## सोन्याची चैन चोरली

**पनवेल** : दुचाकीवरून आलेल्या चोरांनी महिलेच्या गळ्यातील दीड तोळे वजनाची सोन्याची चैन खेचून ते दुचाकीवरून पळून गेले. या प्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत. कळंबोली-रोडपाली सेक्टर-६ येथील ३४ वर्षीय महिला ही आपल्या मैत्रिणीसह बहिणीच्या मुलांना शाळेतुन आणण्यासाठी शाळेत पायी चालत जात होती.

यावेळी रोडपाली तलावाच्या गेटजवळ पल्सर मोटारसायकलवरून आलेल्या दोघापैकी पाठीमागे बसलेल्या चोराने त्यांच्या गळ्यातील ९० हजार रुपये किंमतीची दिड तोळे वजनाची सोन्याची चैन खेचली. त्यानंतर तेथून दोघेही दुचाकीवरून पळून गेले.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## तळा येथे पोषण 'माह' उत्साहात

**। तळा । वार्ताहर ।**
तळा नागरी प्रकल्प रायगड बिट तळातर्फे पोषण अभियानांतर्गत पोषण 'माह' उत्साहात साजरा करण्यात आला. तळा शहरातील मुंढ्याची वाडी येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पोषण अभियानावर रांगोळ्या व प्रात्यक्षिक आहार बनविण्यात आला होता. यावेळी १००० दिवस बाळाचे, सदृढ बालक लसीकरण, आहार, लेक लाडकी योजना, अन्नप्राशन, पालेभाज्यांचे सेवन, हातधूणे, बाळासाठी आई जगलीच पाहिजेत, आशा विविध विषयांवर अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मार्गदर्शन केले. स्त्री अत्याचार या विषयावर पथनाट्य सादर केले. यावेळी त्रिशा वडके या चिमुकलीने मी सदृढ बालिका कशी यावर मनोगत व्यक्त केले.

# रोहा-सुपेगाव-मुरुड मार्गावर ट्रक अडकला वाहतूक ठप्प

## विद्यार्थी आणि प्रवाशांचे हाल

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**
गुरूवारी सकाळी मुरुड सुपेगावमार्गे रोहा मार्गावरील सुपेगाव खिंड रस्त्यावरील अवघड वळणावर बंद पडलेल्या मोठ्या ट्रकने येथील वाहतूक शनिवारी तिसऱ्या दिवशीही बंद पडली आहे.

रोहा तळेखार मार्गावरून सुपेगावमार्गे मुरुड येथे हा ट्रक येत असतानाच एका अवघड वळणावर तो रस्त्याच्या मधोमध बंद पडल्याने या मार्गावरील संपूर्ण वाहतूकच ठप्प झाली. आजूबाजूकडून रुंद जागा नाही. महाकाय ट्रकमुळे संपूर्ण रस्ता व्यापल्याने या मार्गावरील एसटी बस, मिनीडोर अशा वाहनांनी प्रवास करणारे असंख्य प्रवासी, विद्यार्थी, कर्मचारी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. मागील तीन दिवसापासून हा ट्रक जागच्या जागी उभा आहे.



परंतु, तो बाजूला काढण्यासाठी कोणीही दखल घेतली नाही. त्यामुळे अनेक प्रवासी व शालेय विद्यार्थ्यांचे हाल झाले आहेत. या मार्गावरील एसटीची वाहतूकही बंद करण्यात आली आहे. सध्या सुपेगाव मार्ग बंद आहेत. त्यामुळे सर्व एसटी गाड्या आगरदांडा-भालगावमार्गे रोहाकडे सोडण्यात येत आहेत. मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले की, सदरचा विभाग हा रोहा बांधकाम खात्याकडे आहे. याबाबत आम्ही त्यांना लवकरच कळवणार आहोत. परंतु, ट्रक कोणी काढायचा याबाबत काहीच हालचाल नाही.

## चाकुच्या सहाय्याने केले गळ्यावर वार; युवक गंभीर जखमी

**नवीन पनवेल :** चाकूच्या सहाय्याने एका तरुणाने स्वतःच्याच गळ्यावर वार करून घेतल्याची घटना पनवेल शहरात २७ सप्टेंबर रोजी घडली. या तरुणाची ओळख पटली नसल्याने पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. पनवेल शहरातील गुन्हे शाखा कक्ष दोन समोर एका तरुणाने चाकूच्या सहाय्याने स्वतःच्या गळ्यावर वार केले. यात तो गंभीर जखमी झाला आहे. याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला एमजीएम रुग्णालय कामोठे येथे नेण्यात आले. त्याच्या गळ्यावर वार झाल्याने तो बोलण्याच्या स्थितीत नव्हता. त्यामुळे पोलीस या जखमी तरुणाच्या नातेवाईकांचा शोध घेत होते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांचे विद्यमान मालक श्री. गोपाळ विठ्ठल उर्फ विठोबा भगत यांचेकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - कामतपाडा, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५३ | ६ | ०.७३.०० | ०.४७ |
| ५७ | ३ | ०.२६.०० | ०.२२ |

सदरची जमीन मिळकती हया वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती हया तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २९/०९/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७



फोन नं.- २४५५३५
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४

जावक क्र. - १५२८ दिनांक - २७/०९/२०२४

### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत नागांव, ता.अलिबाग, जि. रायगडकडून ग्रामनिधी /१५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य पुरविठेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

| अ. क्र | निधीचा स्त्रोत | अंदाजित रक्कम | कामाचे नाव | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामनिधी | दरपत्रकाप्रमाणे | ग्रा.प. हद्दीतील मागासवर्गीय कुटुंबांना घरगुती वापरासाठी कपाट वाटप करणे.(३८ नग) | ३ महिने |
| २ | ग्रामनिधी | १,००,०००/- | बुरुड आळी समाजमंदिरासाठी स्टेज साहित्य खरेदी करणे. | ३ महिने |
| ३ | १५ वा वित्त | ८४०००/- | अंगणवाडी विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य पुरविणे. | ३ महिने |

१) निविदे/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.३०/०९/२०२४ ते ०४/१०/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.
२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
३) कोणत्याही नामंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठल्याही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/ दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/ दरपत्रके दि. ०७/१०/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
**सौ. श्वेता संजय कदम**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**


## भरत जाधव यांची नियुक्ती

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**
पनवेल येथील सामाजिक कार्यकर्ते भरत ज्ञानदेव जाधव यांची दिव्यांग विकास फाऊंडेशन प्रणित दिव्यांग हक्क संघर्ष समितीच्या पनवेल जिल्हा (रायगड ) अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. भरत जाधव यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

समितीचे अध्यक्ष बापूराव काणे यांनी भरत जाधव यांची ही नियुक्ती जाहीर केली असून याबाबतचे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले आहे. दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी हिरीरीने काम करावे, तसेच दिव्यांग यांचे कार्य तळागळात पोहोचवावे अशा शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.


### हरवले आहे

नंदा लक्ष्मण तळेगावकर रा.उसर खुर्द तालुका तळा जि. रायगड यांचे जवळील (1) MNC registration certificate, (2) MNC Deploma of Examination कागदपत्र हे उसर खुर्द ते तळा प्रवास करीत असताना कोठेतरी पडुन गहाळ झाले आहेत. तरी वरील कागदपत्रे कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.७०३९६६५९०३



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही,याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील सुजित नामदेव घरत, रा. धुतुम, रायगड हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिल तुकाराम बांदेकर आणि माधवी सुनिल बांदेकर, दोघेही रा. निलांजनी ३ रा मजला, प्रार्थना समाज रोड विलेपार्ले मुंबई यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नागांव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १२/४ | २-५३-०० | ०.५० |

पैकी मिळकत मालकाचे खाते नं २१२ मधील क्षेत्र ०-२०-० हे. आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहान, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली राही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक २८/०९/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक रूपाली श्रील मदन उर्फ रूपाली गौतम पाटोळे यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे बिड बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र | उपविभाग क्र | क्षेत्र लागवड योग्य हे.आर चौ.मी | पोट खराबा हे.आर चौ.मी | एकुण हे. आर.चौमी | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| १९ | २/ड | ०.०६.६० | ०.००.७० | ०.०७.३० | ०.०६ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दिनांक: २८/०९/२०२४

**ॲड. मोनाली रामदास हजारे.**
एम. कॉम. एल. एल. बी,
पत्ता-नॅच्युरा वन, ग्राउंड फ्लोअर, सदनिका क्र.००४, इको ग्रीन, डिमार्ट जवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं: ९२६०१०९२८२



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती सर्व हक्कांगासह विकत घेण्याबाबत मिळकतींचे विद्यमान मालक रियाझ अमीरअली करमाळी व असीफ अमीरअली करमाळी रा. डीवाईन ग्रेस, गल्ली नं.७, हिमगीरी शाळेसमोर, टिंगरे नगर, पुणे ४११०३२ यांच्याकडुन विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. १ | ४-५४-९४ | ४५.४९ |
| २) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. २ | ६-०९-२५ | ६०.९३ |
| ३) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं.३ | ५-०६-५० | ५०.६५ |
| ४) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ४ | ५-५७-२५ | ५५.७३ |
| ५) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ५ | ५-४८-२५ | ५४.८२ |
| ६) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ६ | ३-७६-०० | ३७.६० |
| ७) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ७ | ३-६२-३१ | ३६.२३ |
| ८) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ८ | ३-५७-५० | ३५.७५ |
| ९) नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं. ९ | ५-००-०० | ५०.०० |
| १०)नेहुली, ता. अलिबाग | ३/१ब/२ प्लॉट नं.१० | ७-२८-०० | ७२.८० |

सदरहू बिनशेती मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहान, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २९/०९/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग, रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मौसमी प्रविण जैन यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (आर.-चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | १६६/१९०/१९६ /१९७/१९८/१६ | ४-५०-०० | ४५.०० |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २९/०९/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५



दि. ३०/०९/२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक संगीता सुबोध कुलकर्णी यांच्या मालकीची मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेली आहेत. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

| मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्रफळ (चौ.मीटर) | सत्ता प्रकार |
|---|---|---|---|
| आंबेपूर, तालुका अलिबाग | ४२२ | ३०० | क |

वर नमुद केलेली मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ३०/०९/२०२४

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९६३७२७००१९



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती आर्युवैदिक निसर्गोपचाराने/विवाहनोंदणी/कर्ज/ठेवींवर लाखास दरमहा ३०००/- घरबसल्या कामासाठी डॉ.नथुराम शिहू/रायगड ४०२१०६ (पोयनाड-नागोठणा) ७०२००८५२०९
- अलिबाग-मुंबई हायवेवर पिंपळभाट येथे ३००० स्क्वे. फूट, हॉल/जागा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. गरजूंनी अथवा इच्छुक एजंटने संपर्क करावा. संपर्क- ९२२६३७९८४४/९८२३९२७२८८
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी ५० शाखा वेबसाईट संपर्क : ९९२६७६६१२९
- जन्मकुंडली, हस्तरेषा, टॅरोकार्ड, अंकशास्त्र, वास्तूशास्त्र, रत्नशास्त्र, वेलनेस ज्योतिषालय, ९२२६७६६१२९
- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- अगस्त्य फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबाग शाखेत INSTRUCTOR या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता- पदवीधर (BSc/MSc/Bed/Ded/BE) निवड प्रक्रिया- लेखी परीक्षा व मुलाखत. मो. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२, ईश्वर पाईकराव- ८५५२८७७३७४
- अलिबाग-पिंपळभाट स्वामी समर्थ मठासमोर श्री प्रकाश अपार्टमेंट मधील २ BHK फ्लॅटस् विकणे आहेत. (प्रत्येक फ्लोअरवर फक्त २ फ्लॅट) संपर्क : ९४२२६९६१३३/९९२३१८४७०१
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटीस्टँडजवळ ७०३८०९४०८९
- Shop For Sell Near Alibag St Stand 9764548679
- नांदगाव-मुरुड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्त्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क - ९७६९४७४०६३
- अलिबागमधील नामांकित मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : ९८२३४९२६२६/७९९८६१९१९१
- इंटरनॅशनल फास्ट फूड कॅफे मध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत ( अनुभवाची गरज नाही) Five star chicken अलिबाग कामाची वेळ : दुपारी १ ते रात्री ११ (पगार ९०००/-) पार्ट टाइम जॉब : संध्याकाळी ५ ते रात्री ११ ( पगार ६०००/-) संपर्क :call ९६१९३८३२२३/ Whatsapp ८९२८७५५८९५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२९ सप्टेंबर
१) श्री. लक्ष्मण काशिनाथ मुकादम अलिबाग, दि.२९-९-१९५०
२)श्री.सुरेश रामचंद्र म्हात्रे विद्यानगर अलिबाग,दि.२९-९-१९४७


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते
**वरद अमित शेवाळे, अलिबाग**


# विकास कार्यकारी सभेत तक्रारींचा पाऊस

## समूह शेतीला प्रोत्साहन देण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीची वार्षिक सभा शेतकरी सदस्यांच्या प्रश्नांनी गाजली. यावेळी शेतकऱ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना संचालक मंडळाला उत्तरे देता आली नाहीत. तर, सुरुवातीला मागील सभेच्या इतिवृत्तावरून संचालक मंडळात एक वाक्यता नसल्याचे देखील दिसून आले. तसेच, काही शेतकऱ्यांनी समूह शेतीला प्रोत्साहन देण्याचे आवाहन संचालक मंडळाला केले आहे.**



चाळीसहुन अधिक गावातील शेतकरी सदस्य असलेल्या नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीची वार्षिक सभा नेरळ येथील शेतकरी भवनमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र झांजे यांची निवड करण्यात आल्यानंतर सभेला सुरुवात झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र विरले, सचिव श्रीकांत पिंगळे यांच्यासह संचालक राजेंद्र हजारे, वैभव भगत, यशवंत कराळे, अर्चन शेळके, विष्णू कालेकर, शशिकांत मोहिते, कुंदा सोनावळ, सावळाराम जाधव, नारायण तरे, धोंडू आखाडे आदी उपस्थित होते.

यावेळी सभेत बेकरे शेतकरी ॲड. जयेंद्र कराळे यांनी रायगड जिल्हा बँकेत शेतकऱ्यांना सापत्न पणाची वागणूक दिली जात असल्याची तक्रार केली. तर, वंजारपाडा येथील शेतकरी दत्तात्रय मिसाळ यांनी आम्हाला शासनाने घोषित केलेल्या कर्जमाफीचा फायदा मिळाला नसून सोसायटीकडून जाणीवपूर्वक विरोधी पक्षाच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जात नसल्याची तक्रार केली. पुढे जेष्ठ शेतकरी नागो गवळी यांनी शेतकऱ्यांना दिले जाणारे कृषी कर्जाची वसुली किती आहे, वेळेत कर्जाची परतफेड न करणाऱ्या शेतकऱ्यांना लावण्यात येणाऱ्या व्याजाची माहिती देण्याची देखील मागणी केली. तर, तळवडे येथील शेतकरी दिलीप शेळके यांनी नेरळ विविध कार्यकारी सोसायटीने शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समूह शेती साठी कर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच, समूह शेती किंवा गट शेती करण्याची इच्छा असलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशी योजना प्रत्यक्षात आणण्याची मागणी करण्यात आली.

## अंकुश गायकवाड यांचे निधन

**। मुंबई । वार्ताहर ।**



रिपब्लिकन पक्षाचे डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड यांचे शुक्रवारी (दि.२७) वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि बहीण असा परिवार आहे. अंकुश गायकवाड यांच्या पार्थिवावर डोंबिवलीत स्मशानभूमीत बौध्द पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. अंकुश गायकवाड यांच्या अंतयात्रेत रिपब्लिकन पक्षाचे गौतम सोनवणे, अण्णासाहेब रोकडे, दयाल बहादुरे, प्रल्हाद जाधव, नाना पवार, माणिक उघडे, किशोर मगरे, सिद्धार्थ रणपिसे, बाळकृष्ण गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांसाठी नागरी सुरक्षा प्रशिक्षण

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने नागरी संरक्षण दलाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसाचे नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शशिकांत सिरसाठ व हरेश्वर ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आपत्तीचे प्रकार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी व आपली जबाबदारी इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. तसेच, दोरीच्या विविध गाठी व त्याचे उपयोग, आपत्कालीन परिस्थितीत विमोचन करण्याच्या पद्धती, आदी विषयी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

## 'हुतात्मा नाग्या कातकरींची प्रतिमा प्रेरणादायी'



**। वावोशी । वार्ताहर ।**

अवघे २० वर्षे जीवन जगलेला नाग्या महादू कातकरी यांचा इतिहास हा प्रेरणादायी व ऊर्जा देणारा आहे. आपल्या न्याय हक्कासाठी प्रत्येक आदिवासी बांधवांसाठी व पर्यायाने देशासाठी आपले बलिदान अर्पण करणारा हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्याचे भाग्य मला लाभले याचा आम्हाला अभिमान आहे. तसेच, ग्रामपंचायत कार्यालयातील ही प्रतिमा नेहमीच आम्हाला प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन वावोशीचे माजी सरपंच वालचंद ओसवाल यांनी केले. ते हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या पुण्यतिथी निमित्त आपले मनोगत व्यक्त करीत असताना बोलत होते.

या कार्यक्रमाला सरपंच आश्विनी शहासने, माजी सरपंच राजू शहासने, उपसरपंच दीपा शिर्के, खालापूर आदिवासी भवनचे अध्यक्ष अनंता पवार, नागेश पाटील, जतिन मोरे, दिलीप डाके, अंकुश वाघ, बबन वाघमारे, एकनाथ पवार, सखाराम वाघमारे, कैलास पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## पथविक्रेते सदस्य निवडणुका स्थगित

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड-जंजिरा नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेता समितीकडून आठ सदस्यांच्या निवडणूकीचे आरक्षण व कार्यक्रम जाहिर करण्यात आले होते. ही निवडणूक ४ ऑक्टोबरला होणार होती. पथविक्रेत्यांकडुन याची जारेदार तयारी देखील सुरू होती. परंतु, ही निवडणूक स्थगित केल्याने पथविक्रेत्यांकडुन नाराजी व्यक्त केली जात आहे.

पथविक्रेते अरविंद गायकर यांनी सांगितले की, पथविक्रेते सदस्यांची निवडणूकीचे कार्यक्रम जाहिर झाले. परंतु, ही निवडणूक मुरुड-जंजिरा नगरपरिषदेतर्फे पहिल्यांदाच होत असल्याने या निवडणूक संदर्भात राजकीय पक्षांना माहित नाही. ही निवडणूक कशी असणार, नोंदणीकृत पथविक्रेते कीती आहेत, कोण कोणाला मतदान करणार, सदस्यांचे काम काय असणार, पथविक्रेताचा कसा फायदा होणार याची माहिती प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार यांच्याकडुन घेण्यात आली होती. आणि यानंतरच निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी पुर्णतः तयारी केली होती. अचानक प्रशासकीय कारणास्तव ही निवडणूक स्थगित करण्यात आल्याचे पत्र मुरुड-जंजिरा नगरपरिषद कार्यालयाकडुन प्राप्त झाले.

## शालेय विद्यार्थ्यांचा प्रामाणिकपणा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील कोर्लई गावातील सबास्टिन एम. वेगस (६७) या गृहस्थाचे पैशांचे पॉकीट राजवाडा रस्तावर पडलेल्या अवस्थेत दोन विद्यार्थ्यांना सापडले होते. या विद्यार्थ्यांनी ते पॉकीट ताबडतोब पोलीस ठाण्यात जाऊन जमा केले. विद्यार्थ्यांच्या या प्रामाणिकपणाचे पोलिसांकडून कौतुक करण्यात आले.

मुरुड तालुक्यातील कोर्लई गावातील सबास्टिन एम. वेगस हे आपल्या मोटार सायकलवरून मुरुडमध्ये गेले होते. पुन्हा घरी परतताना खिशातुन पॉकीट कुठेतरी पडुन गहाळ झाला होते. त्याच मार्गावरून अंजुमन डिग्री सायन्स कॉलेजचे विद्यार्थी दोन विद्यार्थी सफान शकील खामकर व अरमान सलीम दखनी यांना राजवाडा येथील वळणावरील रस्तावर हे पैशाचे पाकीट सापडले. ते पॉकीट उचलुन मुरुड पोलिस ठाण्यात जाऊन ठाणे अंमलदार यांना सुपुर्त केले. ठाणे अंमलदारांनी सबास्टिन वेगस यांना कळविल्यावर ताबडतोब ते स्वतः पोलिस ठाण्यात येऊन आपल्या ताब्यात घेतले. या मुलांचे सबास्टिन वेगस यांनी आभार मानले. तसेच, पोलिस ठाण्यामार्फत या दोघा विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अभ्यासापुरता करावा: ॲड. पाटील



**। कोर्लई । वार्ताहर ।**

विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन मोठे व्हावे, आपल्या कुटुंबाचे, गावाचे नाव उज्ज्वल करावे व भारताचे आधारस्तंभ बनावे. शाळेत शिक्षण घेत असताना मोबाईलचा वापर अभ्यासापुरता करावा, असे प्रतिपादन लायन्स क्लब ऑफ श्रीबाग सेंटेनिअल अध्यक्ष ॲड. के.डी. पाटील यांनी केले आहे. लायन्स क्लब ऑफ श्रीबाग सेंटेनिअलतर्फे अलिबाग तालुक्यातील सागाव-तळवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आयोजित शालेय साहित्य वाटप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी लायन्स क्लबचे रिजनल चेअर पर्सन ला. विजय वनगे, ला. श्रीकांत पाटील, ला. पी.एन.पाटील, ला. जानू शिद, ला. विजय गायकवाड, लिओ ला. आयुष भगत, ला. सुनील राणे, ला. शैलेश घोसाळकर, अभिषेक चौधरी, स्मित भगत, अनंत वैद्य, मनोहर पाटील, अनिल पाटील, सचिन पाटील, विशाखा कवळे, कल्याणी पाटील, मुख्याध्यापिका आराधना घरत, विनया पाटील, अनिता गोसावी, अमित सुर्वे, शिक्षक वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २९ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### व्यवसायात प्रगती करण्याची संधी

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात अनेक प्रकारच्या संधी प्राप्त होतील, त्याचा योग्य लाभ घेण्याची तयारी ठेवा. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतीतील प्रश्न मार्गी लावता येतील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या कारणांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. छोटे प्रवास संभवतात. मुलांच्या प्रश्नांना व कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. क्रीडा व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. आपण सर्व बाबतीत सावधानता बाळगल्यास अपेक्षित गोष्टी साध्य होऊ शकतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना उत्तम काळ असून त्याचा छान लाभ घेता येईल. व्यवसायात प्रगती करण्याची संधी मिळेल. विवाहइच्छुकांच्या मनोकामना पुऱ्या होण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आपली प्रतिमा मलीन होणार नाही याकडे लक्ष द्या. संभाषणात शब्दफेक योग्य करा. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना-** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. **शुभ दिनांक** -३०,२.

### कोणाबरोबरही स्पर्धा करण्याचे टाळा

**वृषभ :** आपले ग्रहमान पाहता आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन कामाची आखणी केल्यास आपणास समाधान मिळू शकेल. कलाक्षेत्राला, विशेषतः कलाकारलोकानच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. एखादा चांगला प्रस्ताव घेऊ शकता, प्रवासाचे योग येतील. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. मुलांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीची काळजी घ्या. विशेषकरून अपचन, तळपायाची जळजळ यांपासून सावध राहा. आपण कोणाबरोबरही स्पर्धा करण्याचे टाळल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. शेतीविषयक व कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. हाती घेतलेल्या कामांना सफलता मिळेल. येणाऱ्या प्रसंगांना शांततेने सामोरे जा. **महिलांना-** काही कौटुंबिक जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता राहील. बोलण्यात नम्रता असणे हितकारक ठरेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. कंबरदुखी, डोळ्यांची जळजळ यांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक**- १,३.

### मिळणाऱ्या संधीचा लाभ घ्या

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता आपण घेत असलेल्या परिश्रमाला योग्य न्याय दिल्याचे खरे समाधान मिळेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. तरीही नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील एखादे लभाचे पद मिळेल ते घेण्यास हरकत नाही. घरगुती वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. मिळणाऱ्या संधीचा लाभ घेण्याचा प्रयत्न करा. नवेसंबंध जुळण्याची शक्यता आहे. प्रवासात सावधानता बाळगा. प्रकृतीची काळजी घ्या, मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वागल्यास हा सप्ताह लाभदायक राहू शकेल. **महिलांना-** स्थावर-जंगम मालमत्तेतील गुंतवणूक फायदेशीर ठरू शकेल. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगणे हितकारक ठरू शकते. विशेषता जमीनीचा व्यवहार काळजी पूर्वक करा, फसगत होण्याची शक्यता राहील. सर्दी व उष्णता यांचा त्रास संभवतो. **शुभ दिनांक** -२,४.

### भाग्यवंतांना परदेशगमनाचे योग

**कर्क :** आपले ग्रहमान पाहता हा सप्ताह सर्व बाबतीत यश देणारा उत्तम आठवडा म्हणून मानला जाईल. आपली आर्थिक बाजू वृद्धिंगत झाल्याचे दिसून येईल. इतरांवर विसंबण्यापेक्षा स्वबळावर पुढे जा. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतीतील प्रश्न सुटू लागतील. अचानक आपले राहिलेले अडकलेले प्रश्न सुटू लागतील. नवीन घर, गाडी जागा या बाबत खरेदीचे बेत साध्य होतील. आपल्या जवळच्या धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. लांबच्या आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. लांबवर प्रवासाचे योग येतील. ज्यांच्या पत्रिकेमध्ये परदेशी जाण्याच्या योग आहे आशा काही भाग्यवंतांना परदेशगमनाचे योग संभवतात. आपल्या इच्छेप्रमाणे कामे पार पाडता येतील. व्यावसायिक जीवनात एखाद्या स्पर्धेला सामोरे जावे लागण्याची शक्यता राहील. मार्केटिंग क्षेत्राला उत्तम काळ राहील. **महिलांना-** कलाक्षेत्राला, विशेषतः महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. एखादी सुखद बातमी आठवड्याच्या शेवटी मिळण्याची शक्यता राहील. प्रकृती जपा, दातदुखी यापासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** -३०,५.

### कामकाजात प्रगतीची संधी मिळेल

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात मनाजोगता आठवडा आहे, कामाची धावपळ वाढेल. उत्तम आठवडा असला तरी आळस नको. परिश्रमाला पर्याय नाही. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. यामुळे घरातील वातावरण चांगले ठेवता येईल. काही संधी चालून येतील. एखादे चांगले पद मिळेल. समाजसेवेत नावलोकीक मिळेल, संधीचा लाभ घ्या. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावर संपत्तीतून फायदा होण्याची शक्यता आहे. शेती, वाहन, मशिनरीच्या कामकाजात प्रगतीची संधी प्राप्त होईल. धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळेल. दाम्पत्य जीवन उत्तम राहील. अचानक प्रवास योग संभवतात. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. आर्थिक बाजू सुधारेल. नव्या उद्योग-व्यवसायासाठी इतरांवर अवलंबून राहू नये. प्रकृतीस्वास्थ्य जपा. डोळे, कानाचा त्रास संभवतो, तरी जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **महिलांना-** थोडी धावपळ झाली तरी स्थावरबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत जागरूक राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **शुभ दिनांक** - १,४.

### चांगल्या फळाची प्राप्ती होईल

**कन्या :** जातक खूप कल्पनाशील असतात आणि खूप विचार करणारे असतात. यांची कल्पनाशक्तीमुळे यांच्या जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती होत असतेच. परंतु, बऱ्याच वेळा अत्याधिक विचार करण्यामुळे हे आपला मूल्यवान वेळ खराब करून बसतात. या राशीतील लोकांसाठी हा आठवडा शुभ फळदायी राहण्याची पूर्ण अपेक्षा आहे. तुम्ही आपल्या करिअरमध्ये सकारात्मक परिवर्तन आणण्याचा प्रयत्न केला आहे ज्याचे उत्तम फळ तुम्हाला या कालावधीत नक्कीच मिळेल. नोकरी व व्यवसायात तुमची प्रगती होऊ शकते आणि या सोबतच जर मोठ्या भाऊ बहिणींसोबत किवा नतेवाईकांन सोबत कुठल्या गोष्टीला घेऊन वाद चालत आहे तर, हा वाद या सप्ताहात दूर होऊ शकतो. नियमित सुर्योदयाच्या वेळी ॐ नम: शिवायचा जप करा. त्याचा फायदा होऊ शकेल. जीवनसाथीचे आरोग्य या काळावधीत खराब होऊ शकते. **महिलांना-** एकंदर ग्रहमान पहिले असता या साप्ताहात तुमच्या आरोग्याची स्थिती खूप चांगली सांगितली जात नाही. यावेळी तुम्हाला डोळे, डोके आणि कानामध्ये समस्या होऊ शकतात. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक**- २९,३०.

### उत्कर्षाची संधी निर्माण होईल

**तुळ :** तुळ राशीतील एकूण ग्रहमान पाहता हा आठवडा आपल्या मनात योजिलेल्या गोष्टीनुसार साजरा करता येईल. नोकरदारांना बदली बढतीबाबत मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. स्थावर-जंगमबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. व्यावसायिक विस्तार करण्याचा मानस राहील. उत्कर्षाची संधी प्राप्त होईल. महत्त्वाची कागदपत्रे काळजीपूर्वक हाताळा. कुटुंबांना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, रक्तदाबाच्या त्रासापासून सावध राहा. वादाची स्थिती काही वेळा आपले हात रिकामे करू शकते. आजारी व्यक्तींनी नियमित औषधांचे सेवन केले पाहिजे. नियमित सुर्योदयाच्या वेळी श्री गणेश स्तोत्र जप करा. अडचणीची स्थिती निर्माण झाली तरी या स्थितीतून बचाव करण्यासाठी कामकाजात गाफील न राहता चाणाक्षपणे कामे केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने यशदायी जाऊ शकेल. **महिलांना-** कलाक्षेत्राला चांगला काळ असून, महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. **शुभ दिनांक** - ३०,२.

### नोकरदारांना दिलासा मिळेल

**वृश्चिक :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता सुरुवातीला आठवड्यात काही अडथळे आले तरी, त्यानंतरचा काळ ठीक असल्याने व नशिबाची साथ मिळाल्याने पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. कलाक्षेत्राला चांगला वाव मिळेल एखादा चांगला प्रस्ताव कलाकारांना मिळणार आहे. स्थावर मालमत्तेसंबंधीचे प्रश्न मार्गी लागतील. कुटुंबातील काही वाद असतील तर चर्चा करण्यास हरकत नाही त्यातून मार्ग काढता येईल. कौटुंबिक प्रश्नांना सोडवण्यासाठी प्राधान्य द्या. विशेषता मुलांच्या वैयक्तिक गरजा भागविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. हातात पैसा राहणार आहे. त्यामुळे बचत होऊ शकेल आप्तेष्टांच्या गाठीभेटीचे योग येतील. प्रवासात मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. प्रकृती जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या संबंधातील समस्यांवर उपाय करा. **महिलांना-** जोडीदाराची साथ मिळेल. आपल्या मनाप्रमाणे एखादी सुंदरशी भेट मिळणार आहे. आपला मित्र, मैत्रीण परिवार यांच्या साथीमुळे अवघड काम मार्गी लागणार आहे. चांगल्या बातमीमुळे मन प्रसन्न राहील. **शुभ दिनांक** - ३,४.

### घरगुती इलाज करण्याचे टाळा

**धनु :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपल्या करिअरला उज्वल बनवण्यासाठी सतत आपली योग्यता वेळोवेळी निरखून पाहत राहणे खूप गरजेचे आहे. या कालावधीत तुम्ही ही या गोष्टीला उत्तम रित्या समजू शकतात. आपली ग्रहस्थिती पाहता थोडे फार तब्बेत नरम गरम राहण्याची शक्यता आहे पण स्वतःच घरगुती इलाज करणे टाळा. याराशीतील जातकांमध्ये उत्तम ऊर्जा आणि नेतृत्व क्षमता विकसित होऊ शकते. आपल्या याच गुणांच्या कारणाने लोकांमध्ये कर्कराशी थोडी भावनेच्या भरात वाहणारी थोडी रडवी असली तरी तुमचा सहवास मित्रांना हवा हवासा वाटतो. या राशीतील जातकांना आपल्या जीवनात यश मिळवण्यासाठी तुम्हाला आपल्या व्यवहारात विनम्रता आणण्याची आवश्यकता असेल. जर तुम्ही प्रत्येक गोष्टीला घेऊन राग करत असाल तर तुमचा व्यवहार या आठवड्यात तुमच्यापासून दूर होऊ शकतो. **महिलांना-** घरातील स्थितीला उत्तम बनवण्यासाठी तुम्हाला आपल्या जीवनसाथीचा प्रत्येक गरजेच्या गोष्टीवर सल्ला घेतला पाहिजे. या राशीतील ते जातक जे कुठल्या लांब आजाराने चिंतीत आहे त्यांनी नियमितपणे आपले चेकअप डॉक्टरांकडून केले पाहिजे. **शुभ दिनांक** - २,५.

### सज्जनांशी संपर्क वाढेल

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान पाहता या काळात सज्जनांशी संपर्क वाढेल. व्यवसाय, उद्योगात लाभ होतील. ऐकावे जनाचे, करावे मनाचे, या उक्तीप्रमाणे वागावे. आगामी आठवडा आपल्यासाठी चांगला जाईल. बौद्धिक चातुर्याच्या जोरावर अनेक काम पार पाडाल. धाडस वाढेल. गुप्त विद्या आणि अध्यात्मातील गोडी वाढेल. सट्टा, जुगारापासून लांब राहा. मनोरंजनात वेळ गेल्याने मन प्रसन्न राहील. कार्यक्षेत्रात प्रगतीचे योग आहेत. वृत्तीतील गोडवा भाग्योदयासाठी अनुकूल ठरेल. विनाकारण वादात पडू नका. प्रियकर/ प्रेयसीसोबत कुटुंबातील सदस्यांना न सांगता विवाह करण्याचा प्लॅन बनवू शकतात. तथापि, आपल्यासाठी योग्य सल्ला हाच आहे कि, हे करणे तुमच्यासाठी योग्य नाही. तुम्हाला विवाहाच्या आधी आपल्या घरचांसोबत चर्चा केली पाहिजे. मित्र, मैत्रीण यांच्या कडून लाभ संभवतो आहे. कामावर अधिकारी खुश होणार आहेत. **महिलांना-** आपल्या हातून एखादे मोठे कार्य होणार आहे. स्तुति पाठकान पासून सावध रहा. पाळीव प्राण्यापासून लांब राहणे हिताचे ठरणार आहे. आपण प्रवासाचा बेत आता तडीस जाणार आहे. **शुभ दिनांक** - ३,५.

### आपली मते दुसऱ्यांवर लादू नका

**कुंभ :** या सप्ताहात आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, विशेषतः नवकलाकाराला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. थोडा व्यायम अवश्यक आहे कमीत कमी सकाळी श्वासना कडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, योगाचा अवलंब करा. **महिलांना -** कुठल्याही गोष्टींचा अतिरेक होणार नाही याकडे लक्ष द्या. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. **शुभ दिनांक** - २९,३०.

### प्रलोभनात अडकू नका

**मीन :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. **महिलांना-** आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. काम करताना थोडी विश्रांती ही गरजेची आहे. गोडधोडाचा बेत केला जाईल. आपल्या मनातील गुपित आपल्या विश्वासाच्या व्यक्तीरिक्त कुणास कळू देऊ नका. **शुभ दिनांक** - ३०,२.

# प्रसादाने श्रद्धांना तडा

**तिरुपती बालाजी देवस्थानमध्ये देण्यात आलेल्या लाडवांच्या प्रसादात चरबी आणि माशाचे तेल वापरण्यात आल्याच्या आरोपावरून काहूर माजले. हा भाविकांच्या श्रद्धांशी खेळ आहे. त्यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण सुरू असले, तरी तिरुपती देवस्थानच्या प्रतिमेला धक्का बसतो आहे. या प्रकाराचा नेमका सोक्षमोक्ष लावून वाद संपवणे गरजेचे आहे.**

अजय दीक्षित

आंध्र प्रदेशमधील तिरुपती मंदिराच्या प्रसाद (लाडू) मध्ये वापरण्यात आलेल्या तुपात प्राण्यांची चरबी आणि माशाचे तेल असल्याचा एक अहवाल अलिकडेच समोर आला. या प्रकरणावर प्रत्येकजण प्रश्न उपस्थित करत आहे. प्रसादात भेसळ करून हिंदूंच्या श्रद्धेला तडा दिला गेल्याचा आरोप केला जात आहे. लाडू बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तुपात प्राण्यांची चरबी मिसळल्याचे प्रयोगशाळेत केलेल्या चाचण्यांमधून स्पष्ट झाल्याचे आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी जाहीर केल्यानंतर देशभर खळबळ उडाली. दुसरीकडे, अशा प्रकारच्या अहवालालाच आव्हान देण्यात आले आहे. केंद्र सरकारने चार कंपन्यांच्या तुपांचे नमुने तपासले असून एका कंपनीला नोटीस पाठवली आहे. त्याच वेळी नायडू यांच्या आरोपावर माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे तर काहींनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाच्या अहवालाबाबत चिंता व्यक्त केल्यावर हा वाद सुरू झाला. 'एआर डेअरी फूड प्रायव्हेट लिमिटेड'च्या तुपात प्राण्यांची चरबी मिसळल्याची पुष्टी अहवालात मिळाल्याचे चंद्राबाबूंनी सांगितले; परंतु असे तूप खरेदी केलेच नाही, संशय आल्यानंतर तूप नाकारण्यात आल्याचे माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी सांगितले. कोण खरे, कोण खोटे हे तपासात उघड होईल; परंतु त्यांच्या धार्मिकतेचा आणि तिरुपती देवस्थानमधील लाडवांमध्ये झालेल्या भेसळीचा संबंध लावला जात आहे.

मंदीर संस्थानाला तूप पुरवठा करणारे उत्पादक बाजारभावापेक्षा खूपच कमी दराने तूप पुरवत होते, तेव्हा मंदिर संस्थेशी संबंधित लोकांना संशय येऊ लागला. अशा स्थितीत तुपाचा दर्जा तपासण्याची मागणी जोर धरू लागली. संशय अधिक गडद झाल्याने मंदिरात तूप पुरवठा करणाऱ्या सर्व डेअरीच्या तुपाची चाचणी घेण्यात आली. प्रीमियर ॲग्री फूड्स, कृपाराम डेअरी, वैष्णवी, श्री पराग मिल्क आणि एआर डेअरी फूड तिरुमला तिरुपती देवस्थानला तूप पुरवत असे. या घटनेचा परिणाम भारतातील इतर मंदिरांवरही झाला आहे. वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिरात अधिकारी आता अतिरिक्त दक्षता घेत आहेत. प्रशासनाने मंदिरात बनवल्या जाणाऱ्या लाडूंची शुद्धता तपासण्यास सुरुवात केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या देवस्थानाच्या प्रसादालयात बनवल्या जाणाऱ्या प्रसादासाठी मागवण्यात येणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळा असतात. शिर्डीच्या साई संस्थानचीही प्रयोगशाळा आहे. त्यात कच्च्या मालाची गुणवत्ता तपासली जाते. त्याचबरोबर दैनंदिन भोजनालयातील अन्नाची चवही अगोदर प्रसादालय व्यवस्थापक घेतात आणि नंतरच भाविकांना दिले जाते. या पार्श्वभूमीवर तिरुपती बालाजी देवस्थानकडे प्रयोगशाळा असताना तुपातील चरबी त्यांच्या लक्षात आली नाही का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.

आंध्रप्रदेशमधील तिरुपती बालाजी भगवान विष्णूचे अवतार आहेत. गेल्या तीनशे वर्षांपासून त्यांच्या मंदिरात येणाऱ्या हिंदू भाविकांना प्रसाद म्हणून लाडू दिले जात असून या लाडूला २०१४ मध्ये 'जीआय' टॅगही मिळाला आहे. म्हणजे तिरुपती तिरुमला नावाचा हा लाडू फक्त आंध्र प्रदेशच्या तिरुपती मंदिरातच मिळतो. असे असताना चंद्राबाबू नायडू यांच्या दाव्यामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला.



वायएसआर काँग्रेसच्या जगनमोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तिरुपतीमधील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिरालाही सोडले नाही आणि लाडू बनवण्यासाठी निकृष्ट साहित्य आणि प्राण्यांची चरबी वापरली, असा आरोप त्यांनी केला. तुपाच्या नमुन्यात प्राण्यांची चरबी, 'लार्ड' (डुकराच्या चरबीशी संबंधित) आणि माशांचे तेल असल्याचा दावाही केला होता. नमुने गोळा करण्याची तारीख ९ जुलै २०२४ होती आणि प्रयोगशाळेचा अहवाल १६ जुलैचा होता. निविदेतील अटीनुसार, तूप खरेदी केल्यानंतर त्याची चाचणी करणे आवश्यक असते. चाचणीनंतरच तुपाचा वापर करायचा असतो. निविदेतील अटींचा भंग करून तूप चाचणीसाठी पाठवण्यात आले नाही. निविदेतील कलम ८० नुसार, पुरवठा केलेल्या तुपाच्या प्रत्येक खेपेसाठी एनएबीएल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. याशिवाय, निविदा कलम ८१ नुसार तुपाचे नमुने तिरुमला तिरुपती देवस्थान (टीटीडी) ला प्रयोगशाळा चाचणीसाठी पाठवणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर ऑगस्ट २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीच्या आधीच्या नमुन्यांमध्ये ही भेसळ कशी आढळून आली नाही, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तिरुपती देवस्थान ट्रस्टने 'एनएबीएल' प्रमाणपत्रासाठी तसेच चाचणीसाठी नमुने पाठवले नाहीत का, हा प्रश्न उरतो. काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीच्या ज्या बॅचमध्ये भेसळ आढळली, त्याचे 'एनएबीएल' प्रमाणपत्र सादर केले नाही का? गुणवत्तेच्या कमतरतेचे कारण म्हणजे 'इन हाऊस लॅब'चा अभावही समोर आला. नमुने तपासणीसाठी बाहेरील प्रयोगशाळेत पाठवणे आणि वाजवी दर नसणे या कमतरतांचा फायदा घेत पुरवठादारांनी ३२० ते ४११ रुपये प्रती किलोचा दर घेत तूपपुरवठा केला. तेलगु देसम पक्षाच्या सरकारने तिरुपती देवस्थानचे कार्यकारी अधिकारी म्हणून जे. एस. राव यांची नियुक्ती केली. त्यानंतर भेसळीचा अहवाल आला आणि 'एआर डेअरी फूड'चा करार रद्द करण्यात आला. 'एआर डेअरी'ने म्हटले आहे की नामांकित 'एनएपीएल लॅब'मध्ये चाचणी केल्यानंतर आणि ॲगमार्क प्राधिकरणाद्वारे प्रमाणित केल्यानंतरच आम्ही तुपाचे टँकर पाठवले. पाचपैकी एका टँकरबाबत तिरुपती देवस्थानची तक्रार होती. त्या एका टँकरच्या अहवालालाही आम्ही आव्हान दिले आहे. तिरुपती देवस्थानाला दररोज दहा टन तूप लागते. त्यापैकी आम्ही ०.१ टक्कादेखील तूप पुरवत नाही. अहवालात इतर कारणेही नमूद करण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, हे चारा किंवा जनावरांच्या औषधामुळेदेखील होऊ शकते. अहवालात आमचे नाव नाही. आम्ही आरोप फेटाळून अहवालाला आव्हान दिले आहे.

तिरुपती मंदिरानंतर पाटण्यातील महावीर मंदिरात लाडूंची सर्वाधिक विक्री होते. बुद्ध मार्गावर असलेल्या एका कारखान्यात तामिळनाडू आणि कर्नाटकमधील कारागीर प्रसाद म्हणून लाडू तयार करतात. तिथे महावीर मंदिराचे लाडू तयार केले जातात. कारखान्याचे प्रभारी आर. शेषाद्री म्हणाले की नैवेद्य तयार करण्यासाठी बेसन, हरभरा डाळ, शुद्ध गायीचे तूप (नंदिनी ब्रँड), काजू, बेदाणे आणि वेलची यांचा वापर केला जातो. तिरुपती मंदिरातही पूर्वी फक्त नंदिनी तूप वापरले जात होते; परंतु भाव वाढल्याने अन्य कंपन्यांचे तूप वापरण्यास सुरुवात झाली. पाटण्याच्या महावीर मंदिरात मात्र भाव वाढल्यानंतरही नंदिनी तूप घेणे थांबवले गेले नाही. तिरुपतीनंतर देशात दुसऱ्या क्रमाकांच्या लाडूची विक्री तिथे होते. शिर्डीतही साई संस्थान पूर्वी भाविकांना लाडू देत होते. कोणतेही तूप वापरले तरी लाडू बनवल्यानंतर काही वेळात गोठते. त्यामुळे लाडवाला बुरशी लागल्यासारखे दिसते. वास्तविक ती बुरशी नसते; परंतु संशयाला जागा नको, म्हणून आता साई संस्थानने भाविकांना लाडूऐवजी बुंदीचा प्रसाद द्यायला सुरुवात केली आहे. बुंदी तेलात तळली जाते. ती सुकवून भाविकांना दिली जाते. त्यामुळे ती कितीही काळ टिकते. लाडवाचे तसे नसते. लाडू गरम गरम असतानाच बांधावे लागतात. ते सुकल्यानंतर काही काळाने तूप पुन्हा गोठते. बुंदी न वाळवता पॅक केली आणि तुपात तयार केली असल्यास वास येतो. या पार्श्वभूमीवर देशात महागाई वाढत असताना उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात तिरुपती बालाजी देवस्थानला कमी दरात तूप देण्याची तयारी उत्पादकांनी का दाखवली आणि विश्वस्तांनी त्यावर अंधपणाने विश्वास का ठेवला, असे प्रश्न उपस्थित होतात. कर्नाटकच्या नंदिनी दूध संघाने २०१५ मध्ये ३२४ प्रति किलो दर दिला होता, तेव्हा महाराष्ट्रातील 'गोविंद मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टस्'ची २७६ प्रति किलो दराची निविदा तिरुपती देवस्थानने मंजूर केली होती. आठ वर्षांनंतर महागाई वाढली.

गायीच्या तुपाची किंमत ५०० रुपये प्रति किलो असताना एका खासगी कंपनीने ३२० रुपये प्रति किलो दराने कसे देऊ केले, असा प्रश्न विश्वस्त मंडळाला पडला नाही. आत्ता मंदिराने ४७५ रुपये प्रति किलो दराने नंदिनी तूप खरेदी करणे पुन्हा सुरू केले आहे. तिरुपती देवस्थान देत वा विकत असलेले लाडू सुरक्षित आणि भेसळमुक्त आहेत, याची खात्री करण्याची जबाबदारी देवस्थानची आहे; मात्र तूप पुरवठादाराला दोषी ठरवून ते या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवू इच्छितात. गोमांस हा वादाचा विषय आहे आणि आता तो प्रसादाशी जोडला गेला आहे, हे पाहता राजकीय पक्षांनी तणाव निर्माण करणे टाळायला हवे होते. आता आरोप-प्रत्यारोप झाले आहेत आणि संशयाची बीजे पेरली गेली आहेत. लाडूचे पावित्र्य विज्ञानाच्या आधारेच ठरवले पाहिजे. **

# वळीवाचा पाऊस



**वळीव पाऊस म्हणजे ट्वेन्टी ट्वेन्टी क्रिकेट मध्ये शेवटच्या षटकात हाणामारी करणाऱ्या फलंदाजी प्रमाणे आपले अस्तित्व दर्शवित असतो. सगळीकडे नवरात्र उत्सवाची लगबग सुरू असते गरबा दांडिया खेळायला मैदानावर सजावट रात्रीसाठी पूर्व तयारी करत असताना वळीव पाऊस अचानकपणे संध्याकाळपासून अक्षरशः झोडपून काढत असतो.**

धनंजय शेटये

संध्याकाळी निरभ्र असणारे आकाश अचानक गडद ढगांनी दाटुन येते. ढगांचा प्रचंड गडगडाट सुरू होतो. संपूर्ण आसमंतात अचानक अंधारुन आल्याने शेतकऱ्यांची धावपळ सुरू होत असते.अगदी धान्य कापणीसाठी तयार असलेली पोपटी झालेल्या भातशेतींच्या उरात धडकी भरलेली असते. आता आपण सोसाट्याच्या वादळी वाऱ्याबरोबर खाली पडलो तर किंवा वळीव पावसाच्या पूरात वाहुन गेलो तर आपल्या शेतकरीदादाचे किती नुकसान होईल ना! बापरे! आमच्या मालकाच्या मेहनतीचा चक्काचूर होणार नाही का? आमच्या मशागतीसाठी राबराब राबणारा शेतकरी दादा वळीव पावसाला पाहुन थोडासा चिंतित झालेला असतो. तेवढ्यातच प्रचंड वेगाने सोसाट्याचा वादळी वारा वाहु लागतो. पावसाळी वातावरणात हिरवाईने नटलेला आसमंत कमालीचा सुखावलेला असतो. पावसाच्या परतीच्या प्रवासापूर्वी तुडुंब पाण्याने आणखी एकदा यथेच्छ आपण वळीव पावसाच्या पाण्याने पोट भरुन घेण्यासाठी आतुरलेली हिरवीगार वसुंधरा आपले प्रतिबिंब मनसोक्तपणे पाण्यात न्याहाळत असावी असा भास होत असतो.

पहिल्या पावसात मौजमस्ती करायला आलेले चढणीचे मासे वळीवाच्या पावसाबरोबर आता तीन महिन्यांच्या निसर्गाच्या पाहुणचारानंतर माघारी परतत असतात. वळीव पाऊस खरंतर उलट्या दिशेने पडतो. जून महिन्यामध्ये मृग नक्षत्रापासुन पडणारा पाऊस हा अनुभवी कामगाराप्रमाणे शिस्तबद्ध असतो. परंतु वळीव पाऊस म्हणजे ट्वेन्टी ट्वेन्टी क्रिकेट मध्ये शेवटच्या षटकात हाणामारी करणाऱ्या फलंदाजी प्रमाणे आपले अस्तित्व दर्शवित असतो. सगळीकडे नवरात्र उत्सवाची लगबग सुरू असते गरबा दांडिया खेळायला मैदानावर सजावट रात्रीसाठी पूर्व तयारी करत असताना वळीव पाऊस अचानकपणे संध्याकाळपासून अक्षरशः झोडपून काढत असतो. गरबा दांडिया प्रेमींच्या चेहऱ्यावर काहीशी नाराजगी पसरते परंतु वळीव पाऊस त्यांनाही जास्तवेळ नाराज करीत नाही.

ठाणबंदी झालेले गाडीवान बैल गाडीला जुंपण्यासाठी सज्ज झालेले असतात.

खरंतर वळीव पाऊस मनाला सुखावणारा असतो. पण भात कापुन सुकविण्यासाठी माळरानावर गवतावर पसरलेले सुकलेलं भात वाऱ्याच्या वेगाने जमा करावं लागते. ढगांच्या गडगडाटात पावसाच्या आधी हरणाच्या चपळाईने भाताची पेंडके घेऊन कोप-यातुन धावावे लागते. वळीव पाऊस साधारणतः दुपारी दोन नंतरच येतो. वातावरण मन मोहित करुन टाकतो. आक्या, शेंडी, खुण, येंड, जाळे ही मासे पकडण्याची साधने घेवून ओढ्या तलावाच्या दिशेने धावणारी माणसे कमालीची आनंदात दिसतात. तास-दोन तासभर बेधुंदपणे कोसळणारा वळीवाचा पाऊस पूरपरिस्थिती निर्माण करतो. सकाळी पाऊस नसल्याने छत्री न घेऊन जाता बाहेर पडलेला कामगार वर्ग तसेच कामानिमित्त बाहेर गेलेले लोकांचा अचानकपणे येणाऱ्या वळीव पावसामुळे पूरता गोंधळ उडालेला असतो. मध्येच कुठेतरी अडकून पडलेला कामगार वर्ग पाऊस कमी होण्याची वाट पाहत असतो.

हवेत हवाहवासा वाटणारा गारवा असतो. नाक्यावरच्या दुकानदारांने वळीव पावसाच्या वातावरणाचा अंदाज घेऊन आज जरा जास्तच गरमागरम भजी बनवायला सुरुवात करतो. गावातील बुजुर्ग लोक वाफाळलेल्या गरमागरम चहाचा झुरका घेत गरमागरम भज्याची ऑर्डर देतो.

एकंदरीत काय तर वळीवाचा पाऊस आजही आठवणींच मनात घर करुन राहतो. **

# तुका आकाशा एवढा!



जावे संतांच्या गावा!

अनुराधा म्हात्रे

**तुकाराम महाराजः भाग सहावा**

तुकाराम महाराज आता साधकावस्थेतून संतपदावर पोहोचले होते. ''देव पहावयासो गेलो, तेथे देवची होऊनी ठेलो'' असे त्यांनीच एका अभंगात म्हटलेले आहे, त्याप्रमाणे खरोखरच, कठोर साधनेमुळे त्यांना देवत्व प्राप्त झाले होते. ज्यांना परमार्थाची गोडी होती असे अनेक साधक त्यांच्याभोवती जमू लागले. वेलीवर फुललेले हिरव्या चाफ्याचे फुल चटकन दृष्टीस पडत नाही पण त्याचा सुगंध मात्र लपत नसतो. तो चोहीकडे पसरतो. तुकाराम महाराजांचा कीर्ती सुगंध याच प्रकारचा होता महाराजांना स्वतःला कीर्तीचा सोस अजिबात नव्हता पण त्यांचा अधिकार लक्षात घेऊन, अनेकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. बुवांचा धाकटा भाऊ कान्होबा, धोंडोभट पुराणिक, शिवाजी कासार लोहगांवकर, नावजी माळी, बहिणाबाई सिरपूरकर, कचेश्वर चाकणकर, निळोबाराया पिंपळनेरकर अशा अनेक मातब्बर मंडळींचा त्यांच्या शिष्यगणांत समावेश होता. अनेक कर्मठ पंडित, शास्त्री, यांनीही बुवांचे शिष्यत्व पत्करले होते. मठ स्थापन करून शिष्य शाखा निर्माण करण्याचे मात्र महाराजांनी कटाक्षाने टाळले.

वाऱ्याने सुगंध सगळीकडे वाहून न्यावा त्याप्रमाणे त्यांच्या साधूपणाचा सुगंध पंचक्रोशीत दरवळत होता. आजूबाजूच्या गावांतील लोक त्यांना भेटण्यासाठी येत. कीर्तन प्रवचन करण्यासाठी त्यांना आपल्या गावात घेऊन जातं.

संसारी लोकांना महाराज सरळ साधा उपदेश करत. ते सांगत, 'देवाची कृपा लाभावी असं वाटत असेल तर चित्त शुद्ध ठेवायला हवे'' शुद्ध मन हा परमार्थाचा पाया आहे, हा महत्वाचा नियम बुवांना लोकांच्या मनावर ठसवायचा होता. ते पुढे सांगत, 'नामस्मरण करा. सगळ्यांशी गोड बोला. कधी कोणाचे दोष काढू नका आणि शक्य तितका परोपकार करा.''

**'आणिकांचे कानी । गुणदोष मना नाणी ।। तुका म्हणे फार । थोडा करी उपकार ।।'**

चित्तशुद्धी, हरिभक्ती, थोडाफार परोपकार या त्रिसुत्रीमुळे,

'येऊनी अंतरी राहील गोपाळ' अशी ग्वाही महाराज देतात. रणांगणावर लढणाऱ्या शूरवीरांना बुवा सांगत,

**तुका म्हणे शूर।**
**व्हावे धूरेसीच धूर।।**

शास्त्रीपंडित, शेतकरी, व्यापारी, सैनिक शिलेदार, अशा सगळ्याच प्रकारच्या लोकांमध्ये महाराजांची लोकप्रियता वाढत होती.

भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायात एखाद्याला आत्मज्ञान मिळवण्यासाठी किंवा संत पदाला पोहोचण्यासाठी आवश्यक असणारे नऊ गुण सांगितलेले आहेत. अमानित्व म्हणजे श्रेष्ठत्वाचा टेंभा न मिरवणे, अदांभित्व दांभिकपणे न वागणे, अहिंसा, शांती मन आणि वाणीचा सरळपणा, गुरूंची श्रद्धायुक्त सेवा, मन व शरीराची शुद्धी, अंतःकरणाची स्थिरता आणि मन व इंद्रियांचा संयम हे ते नऊ गुण आहेत. तुकाराम महाराजांचे चरित्र पाहता हे सगळे गुण त्यांच्या ठाई होते असे दिसून येते. त्यापैकी अमानित्व म्हणजे श्रेष्ठपणाची भावना किंचितही नसणे, याबाबतचे एक उदाहरण पाहू.

एकदा एक साधक आळंदीत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीपाशी धरण धरून बसला. माऊलींनी त्याला दृष्टांत दिला की, तू तुकाराम महाराजांकडे जा. ते तुला मार्ग दाखवतील. तो साधक देहूत तुकाराम महाराजांकडे आला. माऊलींच्या आदेशावरून त्यांनी त्याला उपदेश केला पण त्या मागची त्यांची भूमिका अतिशय विनम्रपणाची होती. ते म्हणतात,'ज्ञानियांचा राजा गुरु महाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें।।'

माझं पामरा हें काय थोरपण। पायींची वाहण पायीं बरी।।



ज्ञानोबाराया, आपण साक्षात ज्ञानियांचा राजा आहात. आमच्या सगळ्यांचे महागुरु आहात. तरीही माझ्यासारख्या पामराला हे केवढे थोरपण दिलेत! आणि अतिशय विनम्र भूमिका घेऊन पुढे म्हणतात, 'पायीची वाहण पायी बरी'. वास्तविक तुकाराम महाराजांसारख्या थोर संतांबाबत असे शब्द उच्चारणे हे सुद्धा पातकच आहे. केवळ महाराजांची थोरवी सांगण्यासाठीच याचा उच्चार करावा लागतो. एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की, अहंकार नसावा म्हणजे तो किती नसावा, याचे हे उत्तम उदाहरण आहे!

तुकोबारायांच्या चरित्रात त्यांचे सद्शिष्य संत निळोबा यांना मानाचे पान आहे. पिंपळनेर येथील एक श्रद्धावान भक्त निळोबाराया यांच्या कानावर तुकाराम महाराजांचे चरित्र आले होते. महाराजांची थोर भक्ती आणि विठ्ठलमय होण्यासाठी त्यांनी घेतलेले अपार कष्ट, केलेला संघर्ष हे सगळं ऐकून निळोबा प्रभावित झाले. तुकाराम महाराज हेच आपले गुरु आहेत; असे त्यांच्या मनाने पक्के केले व त्यांच्याकडूनच अनुग्रह घ्यायचा हा निर्धार केला.

**'तुका ध्यानी, तुका मनी।**
**तुका दिसे जनी वनी ।**
**तुका तुका म्हणोनी।**
**निशिदिनी बोलावे।।**

असा त्यांना ध्यास लागला पण तुकाराम महाराज तर त्यावेळेला देहांत नव्हते. त्यांनी वैकुंठ गमन केले होते. संत निळोबांना तुकाराम महाराजांच्या भेटीची तळमळ स्वस्थ बसू देत नव्हती. त्यांनी ४२ दिवस अन्नपाण्या वाचून, खडतर तपश्चर्या केली. त्यांचे ते कठोर व्रत पाहून साक्षात पांडुरंग त्यांच्यापुढे प्रकटला पण निळोबांना ध्यास होता तो तुकाराम महाराजांचा! ओढ होती ती तुकोबांच्या दर्शनाची! आणि ती इतकी उत्कट होती की, त्यांनी पांडुरंगाला विचारले, 'प्रार्थिल्या वाचून आलास का? मी तुझी प्रार्थना केली नव्हती. तरी तू कां आलास? त्या प्रल्हाद बाळावर संकट आलं होतं त्यावेळेला तू आलास ते ठीकच होते पण माझ्यावर काही संकट नाही. ''साक्षात पांडुरंगाचे दर्शन झाले पण निळोबाराया गुरुदर्शनाच्या आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. अखेर तुकाराम महाराजांनी त्यांना दर्शन देऊन मस्तकावर हात ठेवून कृपा केली. संत कबीरांनी आपल्या एका दोह्यांत विचारले आहे की, गुरु आणि गोविंद दोघेही आले तर प्रथम कोणाच्या पाया पडायचे आणि पुढे तेच उत्तर देतात, 'बलिहारी गुरु आपना जीने गोविंद दिखाया' गोविंद दाखवणारा आपला गुरुच श्रेष्ठ आहे. संत निळोबांनी हीच श्रेष्ठ गुरुभक्ती दाखवली. पांडुरंगाने त्यांची परीक्षा घेऊन त्यांची गुरुभक्ती कसास लावली. आणि अर्थातच संत निळोबा त्यात उत्तीर्ण झाले.


संत निळोबा महाराजांची कथा म्हणजे कथेत आड कथा वाटण्याची शक्यता आहे पण यातून इतकेच सांगायचे आहे की, संत निळोबांसारखे महान भगवद् भक्त ज्या तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी इतके आतुर असतात, ज्यांचाइतका ध्यास घेततात ते तुकोबाराया किती थोर असतील! अर्थात ही मोजमाप आपल्यासाठी. तुकाराम महाराज मात्र या सगळ्याच्या पलिकडे गेले होते. निंदा स्तुती, मान अपमान, हे त्यांच्या दृष्टीने समान होते. भगवद् भक्तांबद्दल मात्र त्यांच्या मनांत प्रेम आणि करुणा होती. बाकी त्यांचे एका परमेश्वरा खेरीज चित्त कुठेच गुंतलेले नव्हते. परमेश्वरालाही ते आपल्या रोखठोक स्वभावानुसार विचारतात,

**'चित्त घेऊनियां तूं काय देशी।**
**ऐसें मजपाशी सांग आधीं।।**
**तरिच पंढरीराया करीन साटो वाटी ।**
**निघें जया तुटी येईल तें।।**

'माझं चित्त घेऊन तू मला काय देशील? हे आधी सांग. हे बघ पंढरीनाथा, ज्यांत तोटा येईल असा व्यवहार मी करणार नाही. सिद्धी वगैरे काही दिल्यास तर त्या मी बिलकुल घेणार नाही. सिद्धीच काय पण मला मुक्ती हि नको.''देवाला हे परखड बोल सुनावणारे तुकाराम महाराज कोमल अंतःकरणाने पुढे म्हणतात, 'तुका म्हणे तुझें माझें घडे तर। भक्तीचा भाव रे देणेंघेणें।।''

तुझ्या माझ्यांत देण्याघेण्याचा काही व्यवहार व्हायचा असेल तर तू मला तुझ्या भक्तीचा भाव दे. देवभक्तांतील किती प्रेमळ सलगी आहे ही! तुकोबाराया आपले चित्त देवाला देतात म्हणजे सर्वस्व देतात, स्वतःतला 'स्व' देतात आणि त्या बदल्यात काय मागतात, तर फक्त भक्तीभाव ! ऐहिक लाभ तर सोडाच पण जो मोक्ष परमार्थ्यांना अतिशय प्रिय असतो, त्यावरही महाराज पाणी सोडतात. वास्तविक मोक्ष हेच साधकांचे ध्येय असते पण बुवांना त्याचाही मोह नाही. भक्तीभावाचे किती अत्युच्च शिखर तुकाराम महाराजांनी गांठले आहे ! त्या शिखराचे दुरून जरी दर्शन घडले तरी सामान्य माणूस धन्य होईल ! **

# स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या




स्कॉलरशिप परीक्षेचा अभ्यासक्रम व परीक्षेचे स्वरूप इ. १ ली. ते ५ वी. च्या अभ्यासक्रमवार आधारित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी स्तर) व इयत्ता१ ली ते इयत्ता ८ वी च्या अभ्यासक्रमावर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी स्तर) घेण्यात येते. ही एक अत्यंत स्पर्धात्मक परीक्षा ओळखली जाते. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दृष्टीकोन विस्तृत करण्यास आणि करिअरच्या नवीन मार्गात नेण्यास मदत करू शकते. स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थी चांगला घडण्यास मदत होते.

उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असतात. चार पर्यायांपैकी एकच पर्याय अचूक शोधावा लागतो. भविष्यात येणाऱ्या मोठ्या स्पर्धा परीक्षांची पहिली पायरी आणि शालेय जीवनातील स्पर्धा परीक्षा अशी ओळख असणारी शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये घेतली जाते.





आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

शाळांमध्ये लाखो विद्यार्थ्यांकडून प्रश्नसंच सोडविणे, सराव परीक्षा घेणे, विद्यार्थ्यांना विविध टिप्स देणे या पद्धतीने शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करवून घेण्यात येते. कोणताही ताण न घेता आणि मोठ्या आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी असा सल्लाही शिक्षक देत असतात. मात्र त्याचबरोबर विद्यार्थ्याला गरज असते ती शॉर्टकट पद्धतीची, काही गणिती सुत्रांची काही गणिती क्लुप्त्यांची आजच्या लेखात आपण संख्यामालिका अचूक क्रम शोधण्याची पद्धती पाहूया.

या आणि या सारखी इतर सूत्रे क्लुप्त्या मुद्दे यांचा सातत्याने सराव घेऊन स्कॉलरशिप परीक्षेमध्ये आपल्या विद्यालयाचा आपण चांगला निकाल घेऊ शकतो. क्रमश:- पुढील लेखात आपण परिमाणा विषयी माहिती घेऊ .**

| संख्या क्रम | दिलेल्या संख्या मालिकेत अंकांचे नाते ओळखा |
|---|---|
| २, ४, ६, ८, १० | २ ने गुणाकाराने वाढत जाणारी संख्या मालिका |
| ५, १०, १५, २०, २५, ३० | ५ ने वाढत जाणारी संख्या मालिका |
| १, २, ४, ७, ११, १६ | १, २, ३, ४, ५ अंकाने |
| १,४,९,१६,२५,३६ | दिलेली मालिका ही वर्ग संख्यांची मालिका आहे. |
| २२२,३३३,४४४,५५५ | दिलेल्या संख्या मालिकेत दरवेळी १११ संख्येची बेरीज होते. |
| १,२२, ३३, ३३३, ४४४४, ५५५५५ | दशक शतकांच्या पटीत वाढत जाणारी मालिका |
| १, ५, ९, १३, १७ | प्रत्येक बेरजेच्या वेळी ४ संख्या बेरीज करून तयार होणारी संख्या |
| १, ८, २७, ६४, १२५ | संख्यांची घन मालिका |
| २०, १९, १७, १४, १०, ५ | प्रत्येक वेळी वजाबाकी १ अंकाने वाढत जाऊन होणारी मालिका |

# सेवाभावी लोककार्यकर्ता अरुण पाटील

सकाळचे दहा ते साडेदहा वाजण्याची वेळ होती. श्रावण सरींचा उंच पाऊस खेळ सुरूच होता. मध्येच पडणाऱ्या लख्ख उन्हाचं नवीन देहेन या निसर्गरम्य गा-वचे सर्वेश्वर मंदिर तेजांकित झाले आणि सर्वत्र प्रसन्नतेची छाया पसरली. नवीन देहेन गाव हे पोयनाडपासून दीड किलोमीटर शांत असले तरी अंबा नदीला खाडी प्रदेशातील भातजमिनीची हिरवळ मनमोहक वाटत होती. देहेनच्या सर्वेश्वर मंदिर सभागृहात आज जवळजवळ सहाशे ते सातशे आयुष्यमान कार्डांचे मोफत वाटप करण्यात करण्यात आले आहे. पोयनाड परिसर, कुर्डूस, नवखार, सांबरी, कुसुंबळे, मेढे या अवतीभवतीच्या गावातील बंधू-भगिनींचा मेळा जमला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद लहरींची छटा एकमेकांतील उत्साह वाढवित असल्याचे जाणवले. याप्रसंगी याच गावचे सामाजिक कार्यकर्ते अरूण पाटील उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

**मनोभूषां मैत्री विमल कुलभूषां सुचरितं ।**
**सदाभुषासुक्ती: सकलगुणभुषाच विनय: ।।**

चांगल्या कुळाचे भूषण चांगले चरित्र, चांगले बोलणे वाणीचे भूषण, मात्र 'विनय' सर्वगुणांचे भूषण आहे. अशाप्रकारे विनयशील असणे हे मानवी जीवन सौख्याचे सोपे गणित आहे. अरूण पाटील अत्यंत तळमळीने श्रोत्यांशी एकरूप होऊन आपले विचार प्रकट करीत होते. एकप्रकारे प्रेरणाच त्यांच्या रसाळ वाणीतून प्रवाहित होत होती. ग्रामीण अशिक्षित सामान्य जनतेला ते अंधश्रद्धेपासून दूर नेण्याचा प्रयत्नही करीत असल्याचे दिसून आले.

कोण आहेत हे अरूण पाटील? ते कीर्तनकार नाहीत, प्रवचनकारही नाहीत. मात्र आध्यात्मिक वारसा असलेले. वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत चाहते आहेत. मी त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा कळले की, या वैचारिक सुसंस्कृत प्रेरणेने भाष्य करणारे अरूण पाटील. एक सामाजिक क्षेत्रातील प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. आपला स्वत:चा 'ट्रॅव्हल्स' व्यवसाय ते गेले पस्तीस ते चाळीस वर्षे सांभाळून जनसेवेचे ही कार्य करीत आ-हेत. 'कुलस्वामिनी ट्रॅव्हल्स' ही रायगड जिल्ह्यातील असंख्य पर्यटकांची विश्वसनीय प्रवासवाहिनी आहे.



बाळ सिंगासने

गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेले अरूण पाटील यांना त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षीच वडिलांच्या मायेला मुकावे लागले. पिताश्री मधुकर पाटील यांची नाळ वारकरी संप्रदायाशी जुळलेली होती. शेतीत उत्पन्न नाही तरीही कष्टवत जीवन जगून परिवाराचा सांभाळ करणे हे इतिकर्तव्य ते मानीत. आईवडिलांचे संस्कार ही अरूण पाटील यांची शिदोरी होती. आई मोलमजुरी करत असे. आपल्या आर्थिक दुबळेपणाची वेदना बालवयातील अरूणलाही चटके देत होती. अवघ्या सोळाव्या वर्षीच अरूणकुमार मुंबईतील एका ट्रक ड्रायव्हरसोबत क्लिनर म्हणून नोकरी करू लागले. बहीण जयश्री पाटील आणि मामा यांचे प्रेम मिळाले. पोयनाडचे व्यापारी मित्र मोहन जैन आणि प्रदिपभाई पाटील यांच्या मार्गदर्शनानाने जगण्यातील जिद्द निर्माण झाली आणि पुढे उत्तम ड्रायव्हिंग शिकल्यानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'कुलस्वामिनी ट्रॅव्हल्स'च्या व्यवसायाचे धाडस केले. अखंड भारतभर ट्रॅव्हल्स यात्रा सुरू करताना अरूण पाटील यांनी एक आदर्श डोळ्यासमोर ठेवला; तो म्हणजे, 'पर्यटकांना माफक दरात सर्व सुविधा पुरवित प्रवासाचा' आनंद द्यायचा. आनंदाच्या डोही आनंद तरंग ही भावना त्यांच्या काळजात असल्याने प्रवासातही ते पर्यटकांना विविध विषयांवर ऐतिहासिक, अध्यात्मिक, धार्मिक स्थळावर मार्गदर्शन करून 'पर्यटकांचे' मनोरंजन करीत राहिले. गेल्या चाळीस वर्षे ते आजही नव्या उमेदीने हसत-खेळत मार्गदर्शन करतात. त्यामुळे असंख्य प्रवासीही नेहमी कुलस्वामिनी ट्रॅव्हल्सचेच कौतुक करतात. ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेतात. अरूण पाटील यांनी 'महाराष्ट्र दर्शन' ही पहिली सहल त्यावेळी अवघ्या दोनशे रूपये घेऊन सुरू केली. सेवा आणि त्याग या दोन्ही गोष्टी त्यांच्या ट्रॅव्हल्स उद्योगाचे वैशिष्ट्य आहे. भारतातील असंख्य प्रेक्षणीय स्थळे मग ती ऐतिहासिक गडकिल्ले असोत अथवा ब्रदीनाथ, केदारनाथ, द्वारका, काश्मीर ते कन्याकुमारी असो. अरूण पाटील यांच्या कुलस्वामिनीतून प्रवासाला जाणारे सुखद प्रवासाचा आनंद लुटतात. अरूण पाटील हा व्यवसाय सांभाळूनही आपल्या नवीन देहेन गाव परिसरात त्यागी, नि:स्वार्थी, दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून प्रसिद्ध आहेत. गरीब पण हुशार मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक कार्यास मदत करतात. याचे मुख्य कारण म्हणजे, त्यांनी बालपणात अनुभवलेली वेदनादायी गरिबी, दु:ख आणि वडिलांच्या छत्राविना जगण्याचा घेतलेला अनुभव.

मी अरूण पाटील यांना सहजच विचारले, व्यवसाय व समाजकार्य हे कसे शक्य होते? तेव्हा ते हसतच म्हणाले, 'प्रपंच करावा नेटका परमार्थ'ही साधावा. माणसाला मुक्ती केवळ पैशाने मिळत नाही, तर माणसातला देव पाहून इतरांच्या सुखदु:खात सहभागी होऊन उदार मनाने सेवा करण्यातच खरा आनंद आणि मुक्ती लाभते.

आज मी या सर्वेश्वर मंदिरात त्यांचे हे विचार ऐकून मनोमनी समाधानी झालो. कारण असे की, याच मंदिरात अरूण पाटील यांनी गरीब शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र शास-नाची आरोग्यविषयक असलेली पाच लाख विमा लाभ योजना देहेन गावात प्रत्यक्षात राबविली. पंचक्रोशीतील गरीब भगिनी व बंधू शेतकरी यांच्या भविष्यासाठी ती उपयोगी ठरणारी होती. स्वत: कष्ट घेऊन, खर्च करून सेवा देणे हे तसे सोपे काम नाही. पण अरूण पाटील हे स्वत: पुढाकार घेऊन विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम आपल्या गावकरी मित्रमंडळींच्या सहकार्याने राबवित आहेत, हे पाहून मला कौतुक वाटले. कोणत्याही प्रकारच्या भंपक प्रसिद्धीचा हव्यास नाही. मात्र, व्यवसायासोबत जनसेवा हाच श्रेष्ठ धर्म ते मानतात. माणुसकीचा गहिवर असलेली अशी फारच कमी माणसे आपण समाजात पाहतो. मात्र, अरूण पाटील म्हणजे नवीन देहेन या ग्रामीण भागातील लोकमानसातील दीपस्तंभ आहेत, हे नाकारता येणार नाही.

सुमारे दोन तासातच आजच्या समारंभाची सांगता झाली. ग्रामीण भागातून सभास्थानी आलेले कष्टकरी पाच लाख विमा कार्ड घेऊन घरी परतले. अध्यात्मिकतेबरोबरच कर्तव्यदक्ष असलेल्या या लोकसेवकाचा निरोप घेऊन मी त्यांना लाख लाख शुभेच्छा दिल्या आणि शेवटी म्हटलं,

**'कुलस्वामिनीचा आशीर्वाद**
**सदैव राहो तुजपाशी'**
**सामान्यातील असामान्य**
**तू अरूणप्रभा तेजस्वी** **

# प्रेरक, प्रबोधक, चिंतनपर नजराणा : अण्णाभाऊ साठे

विख्यात साहित्यिक विचारवंत आचार्य रतनवाल सोनग्रा हे साहित्य क्षेत्रात अत्यंत आदराने घेतले जाणारे नाव आहे. आजही वयाच्या ८४ व्या वर्षी ते पूर्ण जोमाने कार्यरत आहेत. अलिकडेच त्यांनी विश्वसाहित्यकार या ग्रंथमालेत महापुरुषांवर अंत्यत देखणे, चित्ताकर्षक, मोठे संदर्भमूल्य असलेले ग्रंथ प्रकाशित केले आहेत. हिंदी भाषेत प्रकाशित झालेल्या या मौलिक ग्रंथांचं अभ्यासकांनी अभूतपूर्व स्वागत केलंय. 'विश्वसाहित्यकार जननायक अण्णाभाऊ साठे' हा ग्रंथ नुकताच वाचला.

उच्चभ्रू, तुच्छतावाद्यांनी ज्या अण्णाभाऊंची त्यांच्या हयातीत घोर उपेक्षा केली; त्यांना या संपूर्ण उच्च प्रतीच्या आर्टपेपरवर छापलेल्या या ग्रंथाद्वारे आचार्य सोनग्रांनी श्रीमंत आदरांजलीच अर्पण केली आहे! अण्णाभाऊंचा हा आगळावेगळा महासन्मान केल्यामुळे तमाम सर्जन सृष्टीने आचार्यांना मनभरून धन्यवाद देत, त्यांच्या विशालवृत्तीला अभिवादन करायला हवे.


आचार्यांनी अत्यंत कल्पकतेने या ग्रंथाची निर्मिती केली असून विविध घटना, प्रसंग आणि रंगीत चित्रांच्या माध्यमातून साहित्य सम्राट अण्णाभाऊंचे अफाट कार्य जगासमोर मांडले आहे. या ग्रंथात सोनग्रा यांच्या जीवनातील म हत्त्वपूर्ण अविस्मरणीय घटनांचीही नोंद आहे. मुक्ता साळवे यांच्या मातंग महारांच्या दु:खाचा निबंध याचाही सोप्या भाषेतला. हिन्दी भाषेतला अनुवाद आचार्यांनी केला आहे. आचार्य 'जग बदल घालूनी घाव । सांगुनी गेले मला भीमराव ।। या अण्णाभाऊ लिखित कवितेचा अनुवाद असा करतात -

**''बदलो दुनिया, करो प्रहार**
**मुझे 'भीम' ने दिया विचार**
**धनवानों ने पूरा लूटा**
**सब धर्मों ने हमें कचोटा ।**
**मगरमच्छ ने हिरा निगला**
**चोर बन गए यार ।।**

अशी सुगम्य हिंदी वाचून कधी काळी आचार्य पुणे विद्यापीठात हिंदी भाषेत एम.ए. ला सर्वप्रथम आले होते याचे स्मरण होते. जिवंत राहण्यासाठी वाटेगावहून मुंबईला कामासाठी पायी निघालेल्या साठे कुटुंबात जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे नावाच्या प्रज्ञावंताने दलित साहित्याला जागतिक स्तरावर नेऊन त्याचा सन्मान केला. आचार्यांना अण्णाभाऊ, शाहीर अमरशेख, के. ए. अब्बास, कादरखान, ए. के. हनगल, कमलेश्वर इ. अनेक दिग्गज कलावंतांचा सहवास लाभला होता.

अण्णाभाऊ शाळेत शिकले नाहीत पण त्यांनी जगाच्या विद्यापीठात अनेक माणसं वाचली. गरिबी, व्यथा-वंचना सहन केली. काळजात हाल अपेष्टांचा समुद्र साठवला. त्यातूनच त्यांना वैश्विक विचारधारा गवसली. त्यांच्या मनात मौलिक तेज प्रकटले. विषमतेच्या भयंकर स्वरूपाचे चिंतन करीत त्यांना कथा-कादंबरीचे बीज सापडले. ते जळत राहिले पण लेखणीला शस्त्र बनवून लिहीत राहिले! श्रम, लेखणी आणि मनातील अपार करुणेने त्यांना साहित्य सम्राट बनवले!

अण्णाभाऊंचे परममित्र आर. के. त्रिभुवन यांनी एका परिवर्तन साहित्य संमेलनात सांगितलेला हृदयद्रावक प्रसंग आचार्यांनी नोंदवला आहे. १९६८ मध्ये समाजकल्याण मंत्री बाबूराव भास्कर यांनी अण्णाभाऊंना शासकीय मानधन सुरू केले होते. ते मानधन घ्यायला त्यावेळच्या सचिवालयात गेले. सरकारी लालफितीतल्या अनागोंदीने त्यांना खूप ठिकाणी फिरवले. पण अर्धेतरी मानधन द्या! ही त्यांची मागणी पूर्ण झाली नाही. रात्री घरी परतून ते उपाशिच झोपले. क्रूर मृत्यूने मात्र उपाशी अण्णाभाऊंना खाऊन टाकलं !




डी. बी. जगत्पुरिया

अण्णाभाऊंनी धनिक आणि शोषणाविरुद्ध शेवटपर्यंत लढा दिला. सत्तेतल्या उन्मत्त सांडांविरुद्ध ते लढत राहिले. निकरानेझुंजतराहिले. त्यांनीपेन (शब्द), वाणी आणिकरारीकृर्तत्वामुळे मानवतेचा झेंडा, मानवी स्वतंत्रतेचा ध्वज नेहमी फडकवत ठेवला. मराठी भाषेचे हे सत्त्वशील पाणी राशियातील होल्गा नदीत जाऊन मि ळाले! रशियाने मॉस्किम गोर्कीचे घर जतन करून त्याला प्रेरणास्थान बनवले. फ्रान्समधील 'रोजिनी' या कवीला एका चाहत्याने विचारले, ''आपण आमचे महाकवी आहात. आम्ही पॅरिसच्या एका चौकात आपला पुतळा उभारू इच्छितो.'' ''त्यासाठी किती खर्च येईल'' रोजिनींनी विचारले, ''एक लाख फ्रँक!'' प्रशंसक म्हणाले.

''त्यातले पन्नास हजार फ्रँक मला द्या. मी स्वत: तिथे जाऊन उभा राहतो!'' रोजिनी उवाच.

अस्सलतेची उपेक्षा ही ठरलेलीच असते की काय?

दूरदर्शनसाठी अण्णाभाऊंच्या जीवनावर आचार्य सोनग्रा यांच्याकडून चित्रपट पटकथा लिहून घेतली. ती १ ते १४ ही दृष्ये या ग्रंथात समाविष्ट आहेत. त्यातील संवाद, लावण्या हिन्दीत अनुवाद करतांना त्यांनी आपले कसब-कौशल्य पणाला लावले आहे. ही नाट्य दृष्ये व्यंग-उपहास-हास्याने भरलेली, अन्याय अनाचारावर कडाडून प्रहार करणारी आहेत. रसिक-वाचकांनी याचा आस्वाद घ्यायलाच हवा!

अण्णाभाऊच्या नावावर २० कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, पटकथा, लोकनाट्य, लावण्या इ. असे विपुल लेखन प्रसिद्ध आहे. १९४३ मध्ये बंगालमध्ये भयावह दुष्काळ पडला. त्यावर अण्णांनी पोवाडा लिहिला. ते लोक गायकही होते. त्यांच्या शब्द- वाणीतून क्रांतीचे बोल झडत होते.

**''जय महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्र का गान**
**गाये सर उठाकर, बुलंद आवाज़ में मिलाये तान... ! ''**

हा अनुवादही क्रांतीची द्वाही फिरवणाराच आहे. आचार्य हे तसे आजच्या साहित्य कुलातले श्रेष्ठ सर्जक आहेत. खरे तर त्यांना अ. भा. साहित्य संमेलनातील अध्यक्षपदाचा बहुमान मिळायला हवा. चिंतनपर लेखनासह त्यांच्या नावावर नाटक, बाल नाट्य, स्वकथन, व्यंग नाटक, एकांकिका, अनुवाद अशी मोठी साहित्य संपदा आहे.

भरगच्च चित्र संपदा हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. लेखन मुद्रेतील अण्णा भाऊंच्या चित्राखालील -

**''सागरा प्रसन्न झालासी**
**तरी काय देसी ।**
**कोपलासी सागरा**
**तू तरी काय नेसी ।।**

या ओळी खूप-खूप सांगून टाकतात! अशी ११५ पेक्षा अधिक चित्रे या देखण्या व चिंतनशील ग्रंथात आहेत.

१९५८ मधील पहिल्या दलित साहित्य संमेलनात मुंबई येथे अण्णाभाऊंनी 'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नव्हे तर ती दलित-श्रमिकांच्या तळहातावर टिकली आहे!'' हे क्रांतिकारी विधान केले. लोकगायक अमर शेख, अण्णाभाऊ साठे, शाहीर गव्हाणकर यांचे महत्त्व विशद करतांना विचारवंत एस. ए. डांगे म्हणाले होते ''आमच्या कलाकार कवींच्या लेखनात वर्गीय दृष्टिकोन असतो. तो असलाच पाहिजे. आपल्या श्रमाने ते समाजाची निर्मिती करतात. शेतकरी, मजूर आणि मध्यम वर्गीय यांची समाज निर्मितीत मोठी भूमिका असते.'' या ग्रंथातला हा उल्लेख गौरवशाली आहे. अण्णाभाऊंच्या मकूल (मकबूल) मुलामी या कथेचा हिन्दी अनुवाद वाचकांना एक वेगळा अनुभव प्रदान करतो.

ज्याने दलित साहित्य निर्माण करून जो सोवियत साहित्याचा पितामह ठरला त्या मॉक्सिम गोर्कीला आपल्या देशात भरभरून मान सन्मान मिळाला. आपल्याकडे मात्र सामान्य, हलक्या प्रतीच्या साहित्याला श्रेष्ठ ठरवणारे महान लोक आजही डबक्यातच गुदमरतांना दिसतात. आचार्य सोनग्रा यांनी अवघे पन्नास वर्षाचं आयुष्य लाभलेल्या एका उपेक्षित प्रजापुत्राची गौरवगाथा खूप मेहनतीने साकारली आहे. ग्रंथालयाचा मुकुटमणी शोभेल असा हा प्रेरक प्रबोधनपर नजराणा आहे! आचार्यांच्या कार्यक्षमतेला धन्यवाद.

(मो. ९८६०४८५३९८)

**अण्णाभाऊ साठे**
**लेखक, आचार्य रतनलाल 'संगर', पाण्याच्या सोनग्रा टाकीजवळ, प्रकाशक आर के. सोनग्रा मीरानगर, पडेगांव, पब्लिकेशन औरंगाबाद - ४३१००२**
**मूल्य रु. १,०००/-**

# सदस्य नोंदणी करताना

मुंबई सह संपूर्ण राज्यात तसेच संपूर्ण देशभर विविध राजकीय पक्षांचे सदस्य नोंदणी अभियान अधून मधून सुरू असते. पक्षांमधील सदस्यांची संख्या वाढवणं हा हेतू सर्वच पक्षांचा दिसतो. एखाद्या पक्षाचे सदस्यत्व घेतलं की त्या पक्षाचा आपण अधिकृत कार्यकर्ता झालो अशा अविर्भावात मग सध्या असे कार्यकर्ते वावरत असतात. सदस्य संख्या वाढवणे पक्षासाठी हे खरोखर चांगले काम आहे. परंतु पक्षात येणाऱ्या सदस्यांची कुठल्याही प्रकारची शहानिशा केली जात नाही. म्हणजेच इथे फक्त संख्यात्मक विचार केला जातो गुणात्मक विचार केला जात नाही. असे निदर्शनास येते. ज्यांचे विचार चांगले आहेत. ज्यांना खरोखरच देशासाठी काहीतरी करावयाची तळमळ आहे. ज्यांना इतरांबद्दल आदर मान सन्मान वाटतो ज्यांचे मन साफ आहेत दुसऱ्यांच्या प्रगतीबद्दल यांच्या मनात हेवा द्वेष किंवा कुठल्याही प्रकारचे वाईट विचार येत नाहीत. आपल्या समाजासाठी आपल्या देशासाठी काहीतरी करून दाखवण्याची धमक ज्यांच्याकडे आहे केवळ अशाच लोकांना सदस्य करून घेतले जावे. जेणेकरून आपल्या पक्षाची प्रतिमा उजळून निघेल. आणि एक चांगला समाज घडवता येऊ शकेल. ज्यामुळे निवडणुकीत सुद्धा पक्षाला फायदा होणार आहे.त्यासाठी सर्वच पक्षांनी थोडीशी खबरदारी घेणे गरजेचे आहे. सदस्य किंवा कार्यकर्ता निवडताना त्याच्या आजूबाजूचा परिसर किंवा त्याची पार्श्वभूमी नक्कीच तपासली गेली पाहिजे. चांगल्या आणि निर्मळ मनाच्या तरुणांची राजकारणामध्ये सध्या फार गरज आहे. ही एक काळाची गरज बनली आहे. खरंतर राजकारण हे सत्ता उपभोगण्यासाठी आणि पैसा कमावण्यासाठीच आहे असा कित्येक जणांचा उद्देश असतो केवळ त्यामुळे ते राजकारणात येत असतात. तरुणांनी राजकारणाला करियर क्षेत्र म्हणून निवडण्यास काही हरकत नाही. परंतु तुमचा उद्देश साफ असला पाहिजे. केवळ सत्ता आणि पैसा हा जर तुमचा उद्देश असेल तर या क्षेत्रात नाही आले तरी चालेल कारण हे क्षेत्र वरवर पाहता जेवढे चांगले आहे तितकेच ते आतून घाणेरडे सुद्धा आहे. इथे तुम्हाला पावलोपावली विरोधक असणार आहेत. विरोधकांची म र्जी सांभाळून तुम्हाला सर्वसामान्य जनतेची मनं जिंकायची आहेत. पण त्या सर्वांच्या आधी जनसामान्यात तुमचं पहिलं काहीतरी नाव असायला हवं. जनसामान्यात तुमची प्रतिमा चांगली असायला हवी. लोकांच्या तुम्ही पसंतीस उतरलं पाहिजे. उमेदवार म्हणून तुम्हाला लोकांनी निवडूनही द्यायला हवं. तेव्हा कुठे तुमच्या कार्याला सुरुवात होते. त्यानंतर तुम्ही जे काही चांगलं वाईट कार्य कराल त्यावरून तुमचे पुढचे भवितव्य ठरते.

**चांगल्या विचारांनी प्रेरित असलेल्या तरुणांनी राजकारणात यावं. चांगलं कार्य करावं एक चांगला समाज घडवावा. जेणेकरून जगभरात देशाची प्रतिमा उजळून निघेल. भ्रष्टाचार रिश्वत खोरी चोऱ्या माऱ्या गुंडागर्दी हे कुठेतरी बंद व्हायला हवं. ताबडतोब आणि धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या तरुणांची देशाला सध्या फार गरज आहे. ज्यांना आवड आहे सवड आहे त्यांनी हे क्षेत्र खुशाल निवडा.**

निलेश साठे

आपल्या देशाला महासत्ता बनवायचं असेल तर जास्तीत जास्त तरुणांनी चांगल्या विचाराच्या तरुणांनी मोठ्या प्रमाणात राजकारणात येणं फार गरजेचे झालं आहे. चांगल्या विचारांनी प्रेरित असलेल्या तरुणांनी राजकारणात यावं. चांगलं कार्य करावं एक चांगला समाज घडवावा. जेणेकरून जगभरात देशाची प्रतिमा उजळून निघेल. भ्रष्टाचार रिश्वत खोरी चोऱ्या माऱ्या गुंडागर्दी हे कुठेतरी बंद व्हायला हवं. ताबडतोब आणि धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या तरुणांची देशाला सध्या फार गरज आहे. ज्यांना आवड आहे सवड आहे त्यांनी हे क्षेत्र खुशाल निवडा. आणि स्वत: सोबतच आपल्या देशाचेही भवितव्य उज्वल घडवा. चोर डाकू गुंड आणि बदमाशांन पासून या देशाचे संरक्षण हवं एवढीच सदिच्छा. **

निवडक

### नीरजचे अजिंक्यपदावर लक्ष

**नवी दिल्ली :** सलग दोन ऑलिम्पिकमध्ये पदक पटकावणाऱ्या नीरज चोप्राने आता पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत पदक जिंकण्याचे लक्ष्य डोळ्यांसमोर ठेवले आहे. हरियानातील क्रीडा विद्यापीठात आयोजित 'मिशन ऑलिम्पिक २०३६' कार्यक्रमात नीरज चोप्रा म्हणाला की, हा मोसम नुकताच पार पडला असून आता मी पुढल्या मोसमासाठी सज्ज होत आहे. जागतिक अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेत ठसा उमटवायचा आहे. ऑलिम्पिकही दृष्टिपथात आहे.

### रेकॉर्ड ब्रेकींग फटकेबाजी

**हरारे :** स्कॉटलंडच्या जॉर्ज मुन्सीने रेकॉर्ड ब्रेकींग फटकेबाजी केली. त्याने झिम आफ्रो टी-१० लीगमध्ये शतक झळकावणाऱ्या पहिल्या फलंदाजाचा मान पटकावला आहे. आणि त्याने भारताचा माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पा याचा विक्रम मोडला आहे. या लीगमध्ये सर्वोत्तम वैयक्तिक खेळीचा विक्रम रॉबिनच्या (८८) नावावर होता. त्याने २६३ च्या स्ट्राईक रेटने ३८ चेंडूंत शतक झळकावले आहे. या खेळलीत त्याने १० चौकार व ६ षटकारांची आतषबाजी केली.

### कानपूरमध्ये कोहलीची क्रेझ

**कानपूर :** कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर भारत आणि बांगलादेश संघात कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यावर पावसाचे सावट होते. पहिल्या सत्रानंतरही पावसाच्या सरी बरसण्यास सुरुवात झाली होती. यामुळे या सामन्यात ग्राऊंड स्टाफलाही सतर्क रहावे लागले होते. सामन्यापूर्वी ग्राऊंड स्टाफमधील सदस्य ग्राऊंड झाकण्यासाठीचे कव्हर्स घेऊन उभे होते. याचवेळी विराट कोहली बॅट घेऊन तिथून जात असताना अचानक ग्राऊंड स्टाफमधील एक सदस्य त्याच्या जवळ आला आणि तो विराटच्या पाया पडला.

### अश्विनने रचला इतिहास

**कानपूर :** भारत-बांगलादेश यांच्यातल्या कानपूर कसोटीच्या पहिल्या दिवसातील दुसऱ्या सत्रात आर अश्विन याने इतिहास घडवला आहे. त्याने ब्रेकनंतर बांगलादेशला मोठा धक्का दिला. अश्विनने बांगलादेशची सेट जोडी तोडली. शांतोला त्याने ३१ धावांवर पायचीत केले. २००० सालानंतर कसोटीत सर्वाधिक बळी घेण्याचा विक्रम अश्विनच्या (११३) नावावर आहे. रंगना हेरथ (१०८) व स्टुअर्ट ब्रॉड (१०१) यांनाच फक्त अश्विनच्या जवळ येता आले आहे.

### स्टेडियममधील धोकादायक स्टँड

**कानपूर :** ग्रीन पार्क स्टेडियमवर तीन वर्षांनंतर भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसरा कसोटी सामना सुरू झाला आहे. परंतु, स्टेडियममधील एक स्टँड धोकादायक असल्यामुळे प्रेक्षकांना सावध रहावे लागणार आहे. या ग्रीन पार्क स्टेडियमवर तीन वर्षांनंतर येथे आंतरराष्ट्रीय सामना होत असला तरी स्टेडियम पूर्णतः सुरक्षित नसल्याची परिस्थिती आहे. या स्टँडची क्षमता ४८०० प्रेक्षकसंख्या इतकी आहे. उत्तर प्रदेशच्या पीडब्ल्यूडी विभागाने स्टेडियममधील एक स्टँड धोकादायक असल्याचे जाहीर केले आहे.

# दुसऱ्या कसोटी सामन्यावर पावसाचे सावट

## सामनाधिकाऱ्यांकडून दुसऱ्या दिवसाचा खेळ रद्द

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध बांगलादेश संघात कसोटी मालिकेतील दुसरा सामना कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर सुरू आहे. हा सामना शुक्रवार दि.२७ सप्टेंबर पासून सुरू झाला असून पहिल्या दिवसापासून या सामन्यावर पावसाचे सावट आहे. आता या सामन्यात शनिवारी (दि.२८) म्हणजेच सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पावसामुळे खेळच होऊ शकलेला नाही. दुपारपर्यंत पाऊस थांबण्याची वाट पाहण्यात आली, मात्र खेळ दुसऱ्या दिवशी होऊ शकणार नाही असे लक्षात आल्यानंतर सामनाधिकाऱ्यांकडून दुसऱ्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. यामुळे आता रविवारी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी खेळ पुन्हा सुरू होईल, अशी सर्वांना अपेक्षा आहे.

या सामन्यात पहिल्या दिवशी नाणेफेकीलाही पावसामुळे उशीर झाला होता. पण नंतर सामना सुरू झाला. सुरुवातीला बांगलादेशचे सलामीवीर झाकीर हसन आणि शादमन इस्लाम यांनी संयमी सुरुवात केली होती. परंतु, आकाश दीपने झाकिरला शुन्यावर बाद केले, तर शादमन इस्लामला २४ धावांवर बाद केले. पण यानंतरही बांगलादेश संघाचा कर्णधार नजमुल हुसैन शान्तो आणि मोमिनुल हक यांनी बांगलादेशचा डाव सावरला आणि अर्धशतकी भागीदारी केली. यांनी दुसऱ्या सत्रातही चांगली सुरूवात केली होती. पण २९ व्या षटकात आर अश्विनने शान्तोला ३१ धावांवर बाद केले. तो बाद झाल्यानंतर पुन्हा पावसाला सुरूवात झाली. पावसाचा जोर वाढल्याने पुन्हा खेळ सुरू होऊ शकला नाही. यामुळे पहिला दिवसाचा खेळ थांबवण्यात आला.





पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा बांगलादेशने ३५ षटकात १०७ धावा केल्या होत्या. मोमिनुल हक ८१ चेंडूत ४० धावांवर नाबाद राहिला, तर मुश्फिकुर रहिम ६ धावांवर नाबाद राहिला. दरम्यान, या मालिकेतील पहिला सामना भारताने २८० धावांनी जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. यामुळे आता भारताला दुसरा सामना जिंकून बांगलादेशला व्हाईटवॉश देण्याची संधी आहे. तसेच, बांगलादेशला जर मालिका पराभव टाळायचा असेल, तर त्यांना दुसरा सामना जिंकावाच लागणार आहे.

# लॉर्ड्सवर कांगारूंचा दारूण पराभव

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडच्या संघाने लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या चौथ्या एक दिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला आहे. मालिकेत ०-२ अशा पिछाडीवरून इंग्लंडने मारलेली मुसंडी सर्वांना आश्चर्यचकीत करणारी ठरत आहे. कर्णधार हॅरी ब्रूक, बेन डकेट व लिएम लिव्हिंगस्टन यांच्या फटकेबाजीने हा सामना गाजवला. यानंतर मॅथ्यू पॉट्स, ब्रेडन कार्स व जोफ्रा आर्चर यांनी गोलंदाजीत कमाल करून दाखवली.

इंग्लंडने ३९ षटकांच्या लढतीत ३१२ धावा कुटल्या. फिल सॉल्ट (२२) व डकेट यांनी इंग्लंडला आक्रमक सुरुवात करून दिली. डकेटने ६३ धावा केल्या. विल जॅक्स (१०) अपयशी ठरल्यानंतर ब्रूक व जॅमी स्मिथ यांनी दमदार खेळ करून दाखवला. ब्रूकने ८७ धावा चोपल्या. स्मिथने ३९ धावा केल्या. यानंतर लिव्हिंगस्टनने नाबाद ६२ धावांची खेळी केली.

लक्ष्याचा पाठलाग करतान ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ २४.४ षटकांत १२६ धावांत तंबूत परतला. त्यांच्याकडून ट्रॅव्हिस हेड (३४) व कर्णधार मिचेल मार्श (२८) यांनी सर्वाधिक धावा केल्या. पॉट्सने ४, कार्सने ३ तर आर्चरने २ बळी घेतले.



# पीएनपी होली चाईल्डची उत्कृष्ट कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी होली चाईल्ड सी.बी.एस.ई. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि.२३) झालेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत अजिंक्यपद जिंकून अभिमानास्पद कामगिरी करून दाखवली आहे. इयत्ता नववीतील विद्यार्थी अथर्व मोरे याने १७ वर्षांखालील ७५ ते ८० किलो वजनी गटात अजिंक्यपद मिळवले आहे. या स्पर्धा जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या सहयोगाने रसायनीतील पिल्लई एच.ओ.सी.एल. शैक्षणिक संकुलात आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी अजिंक्यपद मिळवणाऱ्या अथर्व मोरेची विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच, इयत्ता नववीतील झीशान झेंडेकर याने ५५ ते ६० किलो वजनी गटात दुसरे स्थान मिळवत उपविजेतेपद प्राप्त केले आहे.



- **७५ ते ८० किलो वजनी गटात अजिंक्यपद**
- **चित्रलेखा पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक**

यावेळी सी.बी.एस.ई. होली चाइल्ड शाळेच्या मुख्याध्यापीका वेल्लईमल मुरुगन यांनी शाळेच्या यशाबद्दल सांगताना, शाळेची खेळ आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी ही संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाचा परिणाम असल्याचे भाष्य केले.

तसेच, पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी मुख्याध्यापिका वेल्लईमल मुरुगन, उपमुख्याध्यापिका सदाफ शाहबाजकर, क्रीडा शिक्षक आदित्य यादव व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पीएनपी पाष्टी हायस्कूलचे यश

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा क्रिडा अधिकारी व म्हसळा तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धा म्हसळ्यातील इंग्रजी माध्यम शाळेत पार पडल्या. या स्पर्धेत तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग घेतला होता. या क्रिडा स्पर्धेत १७ वर्षाखालील गटात षाष्टी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांनी सर्व सामने जिंकून तालुक्यात पहिला क्रमांक पटकवला आहे. या यशामुळे त्यांची जिल्हास्तरीय खो-खो क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



या क्रिडास्पर्धेतील नेत्रदिपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, माध्यमिक शाळा पाष्टीचे अध्यक्ष राजाराम धुमाळ, मुख्याध्यापक सुदाम माळी यांनी विजयी संघाचे विशेष अभिनंदन केले आहे. तसेच, पंचक्रोशीतील पदाधिकारी, पालक वर्ग व माजी विद्यार्थ्यांनी शाळेवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. हे यश मिळवण्यासाठी शाळेतील क्रिडा शिक्षक प्रफुल्ल पाटील, तसेच शाळेतील शिक्षक बिलाल शिकलगार, ललित पाटील, विनयकुमार सोनवणे, संदिप दिवेकर व विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सुहानीची महाराष्ट्र संघात निवड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून खेळवल्या जाणाऱ्या टी-२० सामन्यांमध्ये मुलींच्या १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघात मूळची सिन्नरकर व सध्या पुण्यात स्थायिक असलेली सुहानी भारत कहांडळ हिची निवड झाली आहे. रांची व जयपूर येथे खेळवल्या गेलेल्या नॅशनल लीगमध्ये तीने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. यावेळी अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर सुहानी हिने महाराष्ट्रातील संघात आपले स्थान पक्के केले आहे. उत्कृष्ट फलंदाज असलेली सुहानी तितकीच चांगली गोलंदाज देखील आहे.

# शालेय कुस्ती स्पर्धा संपन्न

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग आयोजित तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन खोपोलीतील शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय जिमखाना हॉल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत खोपोलीसह खालापूर तालुक्यातील वीसहून अधिक शाळेतील १५० कुस्तीपटूंनी सहभाग घेऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले.



या स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभावेळी खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबू जळगावकर, बांधकाम व अर्थ सभापती यशवंत साबळे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे सदस्य गुरुनाथ साठेलकर, खालापूर तालुका क्रीडा समन्वयक जगदीश मरागजे, मुख्याध्यापक पीजी देशमुख, उपमुख्याध्यापक हेमंत खाडे, जेष्ठ क्रीडा शिक्षक राजाराम कुंभार, मितेश शहा, संजय शिर्के, जयवंत माने आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी राज्यस्तरीय पंच सावळेराम पायमोडे, रोशनी परदेशी, दिवेश पलांडे, विनोद जाधव, ओंकार निंबळे यांनी मोलाची कामगिरी बजावली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जेष्ठ क्रीडा शिक्षक राजाराम कुंभार, प्रार्थना भोपातराव, बुवा यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच, या स्पर्धेतील विजयी कुस्तीपटूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

# फलंदाज मुशीर खानचा अपघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईचा युवा फलंदाज मुशीर खानच्या गाडीचा शुक्रवारी (दि.२७) उत्तर प्रदेशमध्ये भीषण अपघात झाला. यामुळे त्याला आता १६ आठवडे विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. मुशीर खानला आता १ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या इराणी चषक सामन्याला आणि रणजी करंडक स्पर्धेच्या काही लढतींना मुकावे लागणार आहे.



मुशीर व त्याचे वडील नौशाद आणि आणखी दोघे गाडीतून आझमगड येथून लखनौसाठी प्रवास करत होते. यमुना महामार्गावर त्यांची गाडी डिव्हायडरवर आदळली आणि ३-४ वेळा पटली खात अपघात झाला. या अपघातात मुशीरचे वडील आणि अन्य दोन जणांना थोडसे खरचटले आहे. परंतु, मुशीरच्या मानेला दुखापत झाली असून त्याला तातडीने नजीकच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्याला १६ आठवड्यांच्या विश्रांतीचा सल्ला दिला आहे. पुढील उपचारासाठी तो रविवारी (दि.२९) मुंबईत परतणार आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशन व बीसीसीआयची वैद्यकिय टीम दुखापतीची पाहणी करणार आहे.

# श्रीलंकेचे किवींवर निर्विवाद वर्चस्व

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका क्रिकेट संघाने दुसऱ्या कसोटीत निर्विवाद वर्चस्व गाजवले आहे. पहिला डाव ५ बाद ६०२ धावांवर घोषित केल्यानंतर त्यांनी न्यूझीलंडचा संपूर्ण संघ शंभरच्या आत गुंडाळला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्या डावात सर्वाधिक धावांची आघाडी घेणाऱ्या क्रमवारीत श्रीलंका पाचव्या स्थानावर आले आहेत. त्यांनी न्यूझीलंडला फॉलोऑन दिला आहे.



प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ५ बाद ६०२ धावांचा डोंगर उभा केला होतो. चंडिमल (११६), कमिंदू (१८२) आणि कुसल (नाबाद १०६) यांनी शतकी खेळी केली. तसेच, कमिंदूने २५० चेंडूंचा सामना करताना १६ चौकार व ४ षटकार खेचले. मॅथ्यूजने ८८ धावांची खेळी केली. करुणारत्ने (४६) व कर्णधार सिल्वा (४४) यानेही हातभार लावला. फिलिप्सने ३ बळी घेतले.

प्रत्युत्तरात आलेल्या किवींना धक्क्यांमागून धक्के बसले. लॅथम (२), कॉनवे (९), विलियम्सन (७), पटेल (८) हे आघाडीचे चार फलंदाज एकेरी धावसंख्येवर माघारी परतले. रचीन (१०) व मिचेल (१३) यांनी पडझड थांबवण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनाही अनुक्रमे निशान व जयसूर्याने माघारी पाठवले. बंडल (१) व फिलिप्स (०) यांना बाद करून जयसूर्याने डावात पाच बळी घेत विक्रम केला आहे. या विक्रमात त्याने आर अश्विनशी बरोबरी केली आहे.

## महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांचे मत

# 'अजिंक्यपद स्पर्धा भारतीयांमध्येच व्हावी'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बुद्धिबळ विश्वात पुरुषांमध्ये आपली ताकद आणि क्षमता किती आहे हे बुद्धिबळ ऑलिंपियाडमधून सिद्ध झाले आहे. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुनसारखे खेळाडू भारताचे भविष्य आहेत. यामुळे विश्व अजिंक्यपद स्पर्धा दोन भारतीयांमध्येच झाली तर याच्यासारखे दुसरे भाग्य नसेल, असे मत महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी व्यक्त केले आहे. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या ग्लोबल चेस लीगचा कार्यक्रमासाठी विश्वनाथन आनंद मुंबईत आले होते.



> **बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये भारतीय पुरुषांनी एकतर्फी वर्चस्व राखले, यामुळे विजेतेपद निश्चित वाटत होते. कारण एखादी लढत गमावली असली तरी दुसरा खेळाडू त्याची भरपाई करण्याच्या ताकदीचा होता. महिलांमध्ये एक लढत गमावली, नंतर बरोबरीत समाधान मानावे लागले. यानंतर मिळवलेले विजेतेपद आनंददायी होते. पुढे अनेक वर्षे बुद्धिबळ विश्व गाजवण्याची क्षमता पुरुष संघाकडे असली तरी गाफिल राहून चालणार नाही. कारण माझ्या मते पुढची बुद्धिबळ ऑलिंपियाड स्पर्धा अधिक आव्हानात्मक असू शकेल.**
>
> **- महान बुद्धिबळपटू विश्वनाथ आनंद**

बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये पुरुष आणि महिला विभागात प्रथमच अजिंक्यपद मिळवल्यानंतर भारतीय संघ मायदेशी परतल्यानंतर आनंद मुंबईत आले होते. यावेळी बुद्धिबळ ऑलिंपियाडमधील यश आणि भारताचे बुद्धिबळातील भवितव्य याबाबत आनंद भरभरून बोलले. ते म्हणाले की, येत्या काळात विश्वविजेत्या चीनच्या डीन लिरेन याला भारताचा गुकेश आव्हान देणार आहे. या लढतीकडे आता बुद्धिबळ विश्वाचे लक्ष लागून राहिले आहे. सध्याची भारताची बुद्धिबळ खेळातील ताकद आणि प्रगती पाहता भविष्यात ही लढत दोन भारतीयांमध्येच व्हावी, असे आनंद गर्वाने म्हणाले. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुनसारख्या खेळाडूंमुळे बुद्धिबळात भारताची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुढील पाचच काय तर दहा वर्षे तरी भारताचे वर्चस्व राहील, असे देखील आनंद यांनी सांगितले.

# टायगरच्या उलट्या बोंबा

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**

भारत-बांगलादेश यांच्यातल्या दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी पावसाच्या व्यत्यानंतर दुसऱ्या दिवसाचा खेळही वाया गेला आहे. दरम्यान, पहिल्या दिवसाच्या खेळापेक्षा बांगलादेशचा सुपर फॅन टायगर रॉबी याच्या मारहाणीच्या बातमीने गाजला. कानपूर कसोटीदरम्यान बांगलादेशच्या चाहत्याला भारतीयांकडून मारहाण झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरले. अस्वस्थ वाटू लागल्याने त्याला पोलिसांनी नजीकच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तोपर्यंत त्याच्या मारहाणीची बातमी वाऱ्यासारखी पसरली. हा बांगलादेशी फॅन रॉबी टायगर मेडिकल व्हिसावर भारतात आला आहे. त्याला टीबी आहे.



टीबी हा पसरणारा आजार आहे. हा माणूस चेन्नईला गेला आणि आता कानपूरला आला. त्याच्या ड्रेसवर बांगलादेशी पेमेंट ॲपची जाहिरात आहे. तो त्याचा प्रचार करत आहे. यावेळी पोलीस म्हणाले की, कसोटी क्रिकेट सामन्यादरम्यान टायगर नावाचा प्रेक्षक अचानक आजारी पडला. त्याची प्रकृती खालावताच त्यांना वैद्यकीय पथकाच्या मदतीने उपचारासाठी पाठवले व त्यांच्या काळजीसाठी संपर्क अधिकारी नेमण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)